दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–९८ | रविवार दि.२८ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### टिईटी पेपरफुटी:केवळ घटना नव्हे, तर व्यवस्थेच्या अपयशाचे प्रतिबिंब

महाराष्ट्रातील शिक्षक पात्रता परीक्षा (टिईटी) २०२६ पुन्हा एकदा प्रश्नपत्रिका फुटल्याच्या संशयामुळे पुढे ढकलली गेली आणि आदल्या दिवशीच तीन जणांना अटक झाली, ही घटना केवळ कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. ही संपूर्ण परीक्षा प्रशासनाच्या संरचनेतील गंभीर त्रुटी, जबाबदारीतील ढिलाई आणि विश्वासाच्या ढासळत्या पायाभूत व्यवस्थेचे स्पष्ट लक्षण आहे. गेल्या काही वर्षांत परीक्षा प्रक्रियांच्या विश्वासार्हतेवर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून कर्जमाफीची रक्कम खात्यात

## ● आधार प्रमाणीकरणानंतरच लाभ, राज्य शासनाची अंतिम तयारी पूर्ण

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी शेतकरी कर्जमाफी योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये थेट कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यास सुरुवात होणार आहे. यासाठी आवश्यक असलेली प्रशासकीय, तांत्रिक आणि बँकिंग यंत्रणेची सर्व तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती राज्य शासनाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या लाखो शेतकऱ्यांना लवकरच दिलासा मिळणार आहे.**



### तक्रार निवारणासाठी सक्षम यंत्रणा

योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

कर्जमाफीच्या अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारचा विलंब किंवा तांत्रिक अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने संपूर्ण प्रक्रिया महाआयटीच्या माध्यमातून ऑनलाइन आणि आधार क्रमांकावर आधारित केली आहे. राज्यातील सर्व राष्ट्रीयीकृत, जिल्हा मध्यवर्ती सहकारी आणि इतर सहभागी बँकांकडून पात्र कर्जखात्यांची माहिती थेट ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करण्यात येत असून, संगणकीय पडताळणीद्वारे लाभार्थ्यांच्या अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. यामुळे प्रक्रियेत पारदर्शकता राहण्यासोबतच चुकीच्या लाभार्थ्यांना लाभ जाण्याची शक्यता कमी होणार आहे. अंतिम लाभार्थी याद्या गाव चावडी, ग्रामपंचायत कार्यालय, संबंधित बँक शाखा, विकास संस्था तसेच आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. याशिवाय, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर बँकांकडून एसएमएसद्वारेही माहिती पाठविण्यात येणार आहे. ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### बद्री–केदारनाथ मंदिरातही भ्रष्टाचार

डेहराडून: अयोध्येतील राम मंदिरातील कथित देणगी गैरव्यवहाराचा वाद सुरू असतानाच आता बद्री–केदार मंदिर समितीवरही आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि वरिष्ठ वकील विकेश सिंह नेगी यांनी माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांच्या आधारे काही धक्कादायक दावे केले आहेत. नेगी यांच्या म्हणण्यानुसार, मंदिर समितीतील काही सदस्यांनी प्रवास भत्ता आणि दैनिक भत्त्याच्या नावाखाली एका वर्षापेक्षाही कमी कालावधीत लाखो रुपये घेतले. त्यांनी हा निधी भाविकांनी दिलेल्या देणग्यांमधून खर्च झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

### ताईंचा गैरसमज झाला; कदमांची जाहीर दिलगिरी

पुणे: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या 'सारथी' संस्थेच्या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाच्या दोन वरिष्ठ नेत्यांमध्ये पहिल्या रांगेतील आसनव्यवस्थेवरून वाद झाल्याची घटना शुक्रवारी घडली. खासदार मेधा कुलकर्णी यांनी आमदार अभिमन्यू पवार यांनी जातीय स्वरूपाचे वक्तव्य केल्याचा आरोप करून संताप व्यक्त केला आणि कार्यक्रमस्थळ सोडले. मात्र, पवार यांनी हा आरोप फेटाळून लावून गैरसमज झाल्याचे सांगून दिलगिरी व्यक्त केली आहे. आमदार अभिमन्यू पवार यांनी सर्व आरोप फेटाळले. 'मेधाताईंचा गैरसमज झाला आहे.

### गाझा नरसंहारावर मोदी सरकारचे मौन–सोनिया गांधी

दिल्ली: इस्रायलकडून गाझामध्ये सुरू असलेल्या नरसंहाराबाबत काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी केंद्र सरकारवर शनिवारी निशाणा साधला. याबाबत मोदी सरकारचे मौन आणि निष्क्रियता केवळ नैतिकदृष्ट्या निंदनीयच नाही, तर राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनेही अनाकलनीय आहे, असे त्या म्हणाल्या. तर केंद्र सरकारने सोनिया गांधींवर पलटवार केला. त्यांचे वक्तव्य परराष्ट्र धोरणावरील टीका आहे की देशांतर्गत राजकारणात तुष्टीकरणाचा खेळ, असा सवाल सरकारने केला. भारताने पॅलेस्टाईन, इराण आणि मध्यपूर्वेतील आपल्या ऐतिहासिक मित्रराष्ट्रांपासून स्वतःला दूर केले आहे, असा दावा गांधी यांनी केला.

# संघाची स्तुती करायची असेल तर आधी राजीनामा द्या

## राज ठाकरेंची विश्वास नांगरे पाटलांवर घणाघाती टीका

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी वरिष्ठ आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमातील भाषणावरून टीका केली आहे. पोलीस अधिकाऱ्याने कोणत्याही वैचारिक किंवा सामाजिक संघटनेप्रती सार्वजनिक निष्ठा व्यक्त करणे योग्य नसल्याचा दावा करत त्यांनी मुख्यमंत्री आणि राज्य सरकारलाही याबाबत प्रश्न विचारले आहेत.**

राज ठाकरे यांनी लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, पोलीस अधिकाऱ्याची निष्ठा ही केवळ संविधान, कायदा आणि पोलीस दलाच्या कर्तव्याशी असली पाहिजे. मात्र, विश्वास नांगरे पाटील यांनी



एका हिंदू संमेलनात उपस्थित राहून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्याच्या संस्थापकांविषयी गौरवोद्गार काढल्याने त्यांच्या निष्पक्षतेबाबत प्रश्न निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला. राज ठाकरे यांनी संबंधित हिंदू संमेलने जरी अराजकीय असल्याचे सांगितले जात असले, तरी ती प्रत्यक्षात राजकीय स्वरूपाची असल्याचा दावा केला. अशा कार्यक्रमात सरकारी सेवेत असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ▶▶ पान २ वर

# मटक्याचे आकडे लिक होत नाहीत येथे मात्र थेट प्रश्न पत्रीकाच फुटतात !

## नीट नंतर टीईटी ची प्रश्नपत्रिका फुटली: परीक्षा पुढे ढकलण्याची नामुष्की

पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवारी, दि.२८ जून २०२६ रोजी राज्यभरातील १०२८ केंद्रांवर आयोजित करण्यात आलेली शिक्षक पात्रता परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. भिवंडी येथे प्रश्नपत्रिका गैरप्रकाराची माहिती मिळाल्यानंतर परिषदेने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यात बंदी असलेल्या कल्याण मुंबई नावाच्या मटक्याचे आकडे मात्र ठरावीक वेळेतच येतात ते मात्र लिंक होत नाही येथे विद्यार्थी आणि शिक्षकांच्या भविष्याचा आणि आयुष्याचा प्रश्न असतांना पेपर मात्र लिंक होते हे दुर्दव म्हणावे लागेल.**





शनिवारी, २७ जून २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास भिवंडी येथे काही इसमांकडे परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबत माहिती असल्याची गोपनीय माहिती मिळाली. यानंतर भिवंडी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत त्या ठिकाणी धाड टाकली. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पडताळणी केली असता, संबंधित इसमांकडे सापडलेली प्रश्नपत्रिका आणि मूळ प्रश्नपत्रिका यात काही प्रश्न समान असल्याचे आढळले. या प्रकरणी भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ▶▶ पान २ वर

# फेसबुकवरील नोकरीचे आमिष; केज़च्या तरुणाला म्यानमार सीमेवर डांबले

## ● ऑनलाईन फसवणुकीस भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार

केज । प्रतिनिधी

फेसबुकवरील आकर्षक नोकरीच्या जाहिरातीला भुलून बँकॉक येथे डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून काम करण्यासाठी गेलेल्या बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील नांदुरघाट येथील २४ वर्षीय तरुणाला म्यानमार–थायलंड सीमेवरील एका अज्ञात ठिकाणी डांबून ठेवून त्याच्याकडून ऑनलाईन फसवणुकीचे काम करून घेत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नकार दिल्यास अमानुष





छळ, मारहाण आणि जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याची माहिती समोर आली असून, या प्रकरणी बीड सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात एजंट आणि अन्य अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदुरघाट येथील संगीता स्वप्नील काळुंके यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे पती स्वप्नील काळुंके हे ग्राफिक डिझायनर आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी फेसबुकवर बँकॉक येथे डेटा एंट्रीच्या नोकरीची जाहिरात पाहिली होती. जाहिरातीत दिलेल्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर त्यांना दरमहा ७० हजार रुपये पगाराचे आमिष दाखवण्यात ▶▶ पान २ वर

# 'इथे वाघ होतात, तिकडे गाढवाचं जीवन जगा'

## उद्धव ठाकरेंचा खासदार संजय देशमुखांवर बोचरा वार



यवतमाळ । प्रतिनिधी

'दोन आठवड्यांपूर्वी खासदारांची बैठक घेतली. ते म्हणाले मला मुलीची सोयरीक जुळवायची आहे. व्हिडिओ कॉलवरून हजर राहतो. मला काय माहीत मुलीची सोयरिक जुळवत होते की स्वताची सोयरीक जुळवत होते. मी रात्री फोन केला. जुळलं का. हो म्हणाले. जुळलं दोन दिवसाने कळलं. गेले सासरी, आता नांदा तिकडे, गद्दाराच्या कळपात नांदा. इथे वाघाचं जीवन जगत होते. तिकडे गाढवाचं जीवन जगा.' असा घणाघाती वार उद्धव ठाकरेंनी खासदार संजय देशमुख यांच्यावर केला.

माजी मुख्यमंत्री आणि उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे सध्या फुटीर खासदारांच्या मतदारसंघात सभा घेत आहेत. शनिवारपासून पुढील दोन दिवस त्यांच्या सभा पार पडणार आहेत. २७ जून रोजी ▶▶ पान २ वर

# घुले हत्या प्रकरणी सौरव सोनवणेंची एसआयटीकडून चार तास चौकशी

बीड । प्रतिनिधी


हॉटेल चालक विलास घुले खून प्रकरणी खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलाची एसआयटी कडून तब्बल चार तास चौकशी करण्यात आली आहे. सकाळी साडेअकरा वाजता चौकशीसाठी सौरव सोनवणे उपविभागीय अधिकारी कार्यालयात ▶▶ पान २ वर



# घराचा ताब्यानंतरही बिल्डरकडून नुकसान भरपाईची मागणी करू शकतात

नवी दिल्ली । वृतसंस्था

फ्लॅटचा ताबा मिळाला म्हणजे रिअल इस्टेट कंपन्यांच्या सेवेतील त्रुटींविरोधात तक्रार करण्याचा ग्राहकाचा अधिकार संपत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. फ्लॅटचा ताबा हाती आल्यानंतरही, बांधकाम व्यावसायिकाकडून झालेल्या विलंबाबद्दल घर खरेदीदारांना न्यायालयात धाव घेऊन नुकसानभरपाई मागता येऊ शकते, असा महत्त्वपूर्ण निकाल न्यायालयाने दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाचा आदेश रद्द केला ▶▶ पान २ वर



# राज्यात वादळी पावसाचा अंदाज

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. विदर्भात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता आहे. तर काही ठिकाणी जोरदार पावसाच्या ऑरेंज अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मध्यम पावसाचा अंदाज आहे. तसेच मध्य महाराष्ट्र जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला असून कोकणात मध्यम पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे.**

महाराष्ट्र व्यापल्यानंतर चौथ्या दिवशीही मॉन्सूनची वाटचाल ठप्प आहे. पुढील ३ ते ४ दिवसांत उत्तर अरबी समुद्रातील आणखी काही भाग, गुजरातमधील उर्वरित भाग, मध्य प्रदेशातील काही भाग, छत्तीसगड, झारखंड आणि बिहारचा उर्वरित भाग तसेच उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या काही भागांमध्ये मॉन्सून पुढे सरकण्यास अनुकूल परिस्थिती तयार झाल्याचे ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२५ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९४.०० क्विंटल | २,३५० | २,६५० | २,४६३ |
| ज्वारी/हायब्रिड : ९०.०० क्विंटल | २,३०० | ३,००० | २,६३२ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : १२.५० क्विंटल | ६,२६२ | ६,२६२ | ६,२६२ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५०१ | ६,५०१ |
| बाजरी: ८३.५० क्विंटल | २,००० | ३,६६१ | २,७५२ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:७.५० क्विंटल | ६,५०० | ६,६०० | ६,५५० |
| हरभरा: १०.०० क्विंटल | ५,२७१ | ५,४३० | ५,३५० |

# सरसकट कर्जमाफी द्या नाही तर जेलभरो आंदोलन करणार-रोहित पवार



बीड । प्रतिनिधी

सरकारची कर्जमाफीची घोषणा फसवी असून, या कर्जमाफीमध्ये अनेक अटी लादल्याने कर्जमाफी पासून ८० टक्के शेतकरी वंचित राहणार आहेत. या संदर्भात पंढरपूर येथे आम्ही उपोषण केले. यावेळी मंत्री गिरीष महाजन यांनी मुख्यमंत्र्यासोबत बोलून अधिवेशन सुरू होण्यापूर्वी यावर बैठक घेऊन तोडगा काढू असे आश्वासन दिले होते. मात्र ही बैठक झालीच नाही. आता या संदर्भात येत्या २९ जूनला छत्रपती संभाजी नगरच्या केंम्ब्रिज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. तरीही सरकारने दाद दिली नाही तर मग शेवटचा पर्याय म्हणून जेल भरो आंदोलन करण्यात येईल अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी बीड येथील राष्ट्रवादी ▶▶ पान २ वर

### ज्ञानराधाची प्रॉपर्टी योग्य किमतीत विकावी

ज्ञानराधा मल्टीस्टेट मध्ये गोरगरिबांचे पैसे अडकले आहेत. त्यांची प्रॉपर्टी जर योग्य किमतीत विकली गेली तर सर्व पैसे देता येतील मात्र काही धनदांडगे लोक हे कमी भावात प्रॉपर्टी खरेदी करून गोरगरिबांना पैशापासून वंचित ठेवण्याचा उद्योग करत आहेत. त्यांना चाप बसून ही प्रॉपर्टी योग्य किमतीत विकली गेली पाहिजे. शंभर कोटीची प्रॉपर्टी जर २० कोटी ला विकली तर पैसे देणार कसे? असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला.

### सर्वांना समान न्याय द्या

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या संदर्भात बोलतांना रोहित पवार म्हणाले की, बीड जिल्ह्यामध्ये सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे. ज्यांच्यावर अन्याय झाला आहे तो कुठल्या पक्षाचा, कुठल्याही जातीचा हे महत्त्वाचे नाही त्याच्यावर अन्याय झाला त्यांना न्याय मिळालाच पाहिजे आणि सर्वांना न्याय मिळाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. अजित दादाच्या प्रकरणातही सीआयडी काहीच करत नाही ही वस्तुस्थिती असून मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मला मिळत नाहीत अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## अग्रलेख

# टिईटी पेपरफुटी : केवळ घटना नव्हे, तर व्यवस्थेच्या अपयशाचे प्रतिबिंब

महाराष्ट्रातील शिक्षक पात्रता परीक्षा (टिईटी) २०२६ पुन्हा एकदा प्रश्नपत्रिका फुटल्याच्या संशयामुळे पुढे ढकलली गेली आणि आदल्या दिवशीच तीन जणांना अटक झाली, ही घटना केवळ कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. ही संपूर्ण परीक्षा प्रशासनाच्या संरचनेतील गंभीर त्रुटी, जबाबदारीतील ढिलाई आणि विश्वासाच्या ढासळत्या पायाभूत व्यवस्थेचे स्पष्ट लक्षण आहे.

गेल्या काही वर्षांत परीक्षा प्रक्रियांच्या विश्वासार्हतेवर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सारख्या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षांतील वाद अजूनही पूर्णपणे शांत झालेले नाहीत, आणि त्याच पार्श्वभूमीवर राज्यातील टिईटी परीक्षेत पुन्हा संशय निर्माण होणे ही साधी योगायोगाची घटना मानता येत नाही. हे एक असे व्यवस्थात्मक अपयश आहे जे वारंवार स्वतःची पुनरावृत्ती करत आहे, पण त्यावर ठोस उपाययोजना दिसत नाही. टिईटी परीक्षा ही केवळ नोकरी मिळवण्याची प्रक्रिया नाही, तर भविष्यातील शिक्षक निवडण्याची निर्णायक यंत्रणा आहे. त्यामुळे या परीक्षेची पवित्रता अधिक महत्त्वाची ठरते. परंतु जेव्हा अशा परीक्षाच संशयाच्या भोवऱ्यात अडकतात, तेव्हा त्याचा परिणाम केवळ उमेदवारांवर मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण शिक्षणव्यवस्थेच्या नैतिक पायावर आघात करतो. शिक्षक घडविणाऱ्या प्रक्रियेतच जर अनियमितता असेल, तर पुढील पिढीच्या शिक्षणावर त्याचे दूरगामी परिणाम अपरिहार्य ठरतात. या घटनांचा सर्वात चिंताजनक पैलू म्हणजे त्यांची पुनरावृत्ती. एकदा अपवाद म्हणून पाहिली जाणारी घटना आता पॅटर्न बनत चालली आहे. प्रत्येक मोठ्या परीक्षेनंतर चौकशी, अटक, तपास समित्या आणि तात्पुरती स्थगिती हेच चक्र सुरू राहते. परंतु या प्रक्रियेत मूळ प्रश्न कायम राहतो. पेपर लीक नेमका होतो कसा? आणि तो रोखण्यात यंत्रणा का अपयशी ठरते? परीक्षा व्यवस्थेतील तांत्रिक प्रगती असूनही ही असुरक्षितता का टिकून आहे, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. डिजिटल सुरक्षा, कडक नियमावली आणि नियंत्रित वितरण व्यवस्था असूनही जर प्रश्नपत्रिका बाहेर जात असेल, तर समस्या केवळ तंत्रज्ञानात नाही, तर मानवी साखळीतील गळतीत आहे. छपाईपासून वितरणापर्यंत आणि स्थानिक स्तरावरील हाताळणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर जबाबदारीची स्पष्टता असणे आवश्यक असते, परंतु प्रत्यक्षात ही साखळी अत्यंत कमजोर दिसते. याचबरोबर एक आणखी गंभीर बाब म्हणजे उत्तरदायित्वाचा अभाव. अशा घटनांनंतर तातडीने कारवाई होते, अटकही होतात, पण दीर्घकालीन जबाबदारी निश्चित केली जात नाही. कोणत्या स्तरावर सुरक्षा भंग झाली, कोणत्या यंत्रणेने दुर्लक्ष केले, आणि भविष्यात अशी घटना टाळण्यासाठी कोणते संरचनात्मक बदल केले गेले, याची पारदर्शक माहिती फारच क्वचित समोर येते. परिणामी, प्रत्येक नवीन प्रकरण जुन्या प्रकरणाचीच पुनरावृत्ती ठरते. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने या घटना अत्यंत अन्यायकारक आहेत. वर्षानुवर्षे केलेली मेहनत, आर्थिक गुंतवणूक आणि मानसिक ताण यानंतर अचानक परीक्षा पुढे ढकलली जाणे किंवा रद्द होणे हे केवळ निराशाजनक नाही, तर व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करणारे आहे. परीक्षेच्या तयारीवर आधारित संपूर्ण भविष्य एका अनिश्चिततेत ढकलले जाते, आणि या अनिश्चिततेला जबाबदार कोण, याचे ठोस उत्तर कुठेच मिळत नाही. शासनाने परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय तातडीच्या परिस्थितीत घेतलेला असू शकतो, परंतु तो उपाय नाही. तो फक्त परिणाम नियंत्रित करण्याचा प्रयत्न आहे, मूळ कारणावर उपाय नाही. जर परीक्षा प्रणालीतील गळती थांबवायची असेल, तर संपूर्ण साखळीचे स्वतंत्र आणि कठोर ऑडिट, तंत्रज्ञानाबरोबरच मानवी घटकांवर नियंत्रण, आणि जबाबदारी निश्चित करणारी कठोर चौकट आवश्यक आहे. आजची परिस्थिती ही इशारा आहे. परीक्षा व्यवस्था जर वारंवार संशयाच्या छायेत अडकत असेल, तर ती सुधारण्यापेक्षा पुनर्रचनेची मागणी करते. अन्यथा, प्रत्येक नवीन परीक्षा ही जुन्या चुका पुन्हा उजागर करणारी ठरेल, आणि विश्वास हा शब्द केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहील.

## दो बुंद जिंदगी के

# पल्स पोलिओ मोहिमेत आपल्या बालकांचे लसीकरण करून घ्यावे-जिल्हाधिकारी मित्तल

### जिल्ह्यात २ लक्ष ५६ हजार बालकावर लसीकरण होणार

**जालना । प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्यात आज राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असून, ० ते ५ वर्षे वयोगटातील २ लाख ५६ हजार ८७५ बालकांना पोलिओची मात्रा देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पालकांनी आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओची लस देऊन मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.**





पल्स पोलिओ मोहिमेसाठी सूक्ष्म कृती आराखडा तयार करून ग्रामीण व शहरी भागात पोलिओ बुथची व्यवस्था करण्यात आली आहे. मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कर्मचारी, पर्यवेक्षकांसह एकूण ५ हजार ५४७ मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे. अंगणवाडी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी नागरी आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, रेल्वे स्थानक, बसस्थानक तसेच काही खासगी रुग्णालयांमध्ये पोलिओ बुथ उभारण्यात आले आहेत. या ठिकाणी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओची मात्रा दिली जाणार आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पालकांना आवाहन करताना सांगितले की, ''पोलिओमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येक बालकापर्यंत लसीकरण पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू देऊ नये.

# जोला येथे पल्स पोलिओ जनजागृती रॅली उत्साहात

### प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक डोस देण्याचे आवाहन

**केज । प्रतिनिधी**

**रविवार दिनांक २८ जून २०२६ रोजी साजऱ्या होणाऱ्या पल्स पोलिओ दिवसानिमित्त केज तालुक्यातील मौजे जोला येथे श्री तुळजाभवानी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, जोला व प्राथमिक आरोग्य केंद्र, विडा यांच्या संयुक्त विद्यमाने व्यापक जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.**




रॅलीदरम्यान गावातील प्रमुख रस्त्यांवरून फिरत नागरिकांना पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. ''दोन थेंब जीवनाचे'', ''पोलिओमुक्त भारतासाठी प्रत्येक बालकाला लस द्या'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. तसेच पालकांनी कोणतेही मूल लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या तथा श्री तुळजाभवानी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या सचिव सौ. आशाताई बाजीराव ढाकणे यांनी पोलिओ निर्मूलनासाठी जनजागृती आणि शंभर टक्के लसीकरण हे अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येक नागरिकाने या राष्ट्रीय आरोग्य अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. या जनजागृती रॅलीत सुनिता केदार, विमल ढाकणे, भामाबाई ढाकणे, अंकिता ढाकणे, हरीबाई ढाकणे, प्रियांका ढाकणे, राजेंद्र ढाकणे, श्रीहरी ढाकणे यांच्यासह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमामुळे गावात पल्स पोलिओ मोहिमेबाबत जनजागृती निर्माण झाली असून प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक डोस मिळावा, हा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचला.

# अल निनोच्या संभाव्य प्रभावावर मात करण्यासाठी राडीकरांची तयारी

## बी.बी.एफ तंत्रज्ञानावर सोयाबीन पेरणीला सुरवात

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**यंदाच्या खरीप हंगामात अल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई तालुक्यातील राडी महसूल मंडळातील शेतकऱ्यांनी बीबीएफ आणि सरी वरंबा पद्धतीने पेरणीला सुरुवात केली आहे. कमी पावसाच्या परिस्थितीतही उत्पादन टिकवण्यासाठी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब केला जात आहे.**

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या खरीप मोहीम अंतर्गत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे व तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राडी येथे सोयाबीन पिकासाठी बीबीएफ तंत्रज्ञान व सरी-वरंबा पद्धतीने पेरणी करण्यावर विशेष भर दिला जात आहे. राडी महसूल मंडळात मागील पाच वर्षांपासून बी बी एफ तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर होत असून मराठवाड्यात या पद्धतीने सोयाबीन लागवडीचे क्षेत्र वाढविण्यात राडी परिसर आघाडीवर आहे. बीबीएफ पद्धतीमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते, अतिरिक्त पाण्याचा निचरा होतो तसेच जमिनीतील ओलावा अधिक काळ टिकून राहतो. त्यामुळे कमी पावसाच्या परिस्थितीतही पिकाला फायदा होतो. यंदा अल निनोचा प्रभाव लक्षात घेऊन राडी येथील शेतकऱ्यांनी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. यामध्ये हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी उपाययोजना, दशपर्णी अर्काचा वापर, रासायनिक खतांचा संतुलित वापर, जमिनीची योग्य मशागत, मूलस्थानी जलसंधारण तसेच उताराच्या विरुद्ध दिशेने सरी तयार करून पेरणी करण्यास प्राधान्य दिले जात आहे. पेरणीपूर्वी बियाण्याची १०० टक्के उगवण क्षमता तपासणी करून रासायनिक व जैविक बीजप्रक्रिया करण्यात येत आहे. त्यामुळे बियाण्याची उगवण क्षमता वाढून पीक जोमदार येण्यास मदत होणार आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीऐवजी शास्त्रोक्त पद्धतीचा स्वीकार करण्यास सुरुवात केली आहे. कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी किशोर अडगळे हे शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन तंत्रज्ञान, बीजप्रक्रिया, खत व्यवस्थापन व पिकांच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन करत आहेत. तसेच झाशीची राणी महिला शेतकरी गट आणि रॉयल शेतकरी गटाच्या माध्यमातून शेतकरी आधुनिक शेती पद्धतीचा अवलंब करण्यासाठी पुढाकार घेत आहेत.



## पान १ वरून...

### जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून

त्यामुळे लाभार्थ्यांना स्वतंत्रपणे चौकशी करण्याची गरज भासणार नाही. यादीत नाव आल्यानंतर शेतकऱ्यांनी आधार क्रमांक किंवा यादीतील विशिष्ट क्रमांकासह आपले सरकार सेवा केंद्र अथवा संबंधित बँकेत जाऊन बायोमेट्रिक अथवा आधार प्रमाणीकरण करणे बंधनकारक राहणार आहे. कर्जखात्याची माहिती शेतकऱ्यांनी स्वतः पडताळून तिची खात्री दिल्यानंतरच शासनाकडून कर्जमाफीची रक्कम थेट संबंधित कर्जखात्यात जमा केली जाईल. त्यामुळे लाभार्थ्यांनी प्रमाणीकरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे आवश्यक असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, एकवेळ समझोता योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र अट लागू करण्यात आली आहे. या योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांच्या वाट्याची रक्कम संबंधित बँकेत जमा करणे आवश्यक राहील. त्यानंतरच शासनाकडून मंजूर करण्यात आलेली कर्जमाफीची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात वर्ग केली जाईल. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित कर्ज खाते नियमित करण्यात येणार आहे. शासनाने संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, डिजिटल आणि शेतकरीहिताची असल्याचा दावा केला असून, कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत लाभार्थी यादी तपासावी आणि वेळेत आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन केले आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून टप्प्याटप्प्याने कर्जमाफीची रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये जमा होणार असल्याने राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या अपेक्षा आता प्रत्यक्षात उतरणार आहेत.

----------

### मटक्याचे आकडे लिक होत नाहीत

परीक्षा पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने व्हावी, ही परीक्षा परिषदेची भूमिका आहे. प्रश्नपत्रिका फुटीच्या संशयामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याने, परिषदेने खबरदारीचा उपाय म्हणून परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय जाहीर केला आहे. शिक्षक पात्रता परीक्षेच्या पुढील तारखेबाबतची अद्ययावत माहिती लवकरच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध केली जाईल, असे आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी स्पष्ट केले आहे.

-------------

### संघाची स्तुती करायची

सहभागी होणे योग्य आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. त्यांनी पुढे म्हटले की, जर एखाद्या अधिकाऱ्याला एखाद्या संघटनेबद्दल वैचारिक जिव्हाळा असेल, तर तो वैयक्तिक पातळीवर ठेवावा. सार्वजनिकपणे अशी भूमिका घ्यायची असेल, तर आधी सरकारी सेवेचा राजीनामा द्यावा आणि त्यानंतर संबंधित संघटना किंवा राजकीय पक्षात प्रवेश करावा. राज ठाकरे यांनी सरकारवरही निशाणा साधत, अशा प्रकारच्या कृतीबाबत सरकारची भूमिका काय आहे, असा प्रश्न उपस्थित केला. ''आज ही भूमिका मान्य केली जात असेल, तर भविष्यात दुसऱ्या कोणत्याही विचारसरणीच्या कार्यक्रमात एखादा अधिकारी सहभागी झाला, तर त्यालाही हेच निकष लागू होतील का?'' असा सवाल त्यांनी केला. यावेळी त्यांनी २०१२ मधील एका घटनेचाही उल्लेख केला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या मोर्चादरम्यान एका पोलीस कॉन्स्टेबलने पक्ष कार्यकर्त्यांचे अभिनंदन केल्यामुळे त्याला सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आल्याचे उदाहरण देत, त्याच निकषांचा वापर आता केला जाणार का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. राज ठाकरे यांनी आपल्या निवेदनात पुढे म्हटले की, सध्याच्या राजकीय परिस्थितीत विरोधी पक्षांची संख्या कमी होत असताना सरकारी अधिकारीदेखील जर निष्पक्ष राहिले नाहीत, तर नागरिकांनी विश्वास ठेवायचा कोणावर, असा प्रश्न निर्माण होतो. शेवटी त्यांनी विश्वास नांगरे पाटील यांना उद्देशून, ''तुम्ही एक सक्षम आणि कार्यक्षम अधिकारी आहात. त्यामुळे कोणत्याही राजकीय पक्ष किंवा संघटनेसमोर आपल्या निष्पक्षतेशी तडजोड करू नका,'' असे आवाहन केले.

-----------

### 'इथे वाघ होतात, तिकडे

त्यांनी यवतमाळ येथे जात पहिली सभा घेतली. या सभेतून त्यांनी उबाठाचे फुटीर खासदार संजय देशमुख यांच्यावर सडकून टीका केली. पुढे बोलताना उद्धव ठाकरे यांनी, 'आता हा गद्दार जिथे सापडेल तिथे जाब विचारा. मी निवडून आणलं, का गद्दारी केली. मला पैसे मिळाले असते तर मीही तुला पाडू शकलो असतो. पण मी भगव्याला जागलो. निष्ठेला जागलो. तू बोल का गद्दारी केली. असं विचारा. पुढचे तीन वर्ष हा कार्यक्रम करावा लागेल असं आवाहन शिवसैनिकांना त्यांनी केले आहे.

**भर सभेत शिवसैनिकांची मागितली माफी**

या सभेतून फुटलेल्या खासदारांवर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर सडकून टीका केली. काहीवेळेला माझी चूक होते. माझ्या सांगण्यावरून जे तुम्हाला मी एक बुजगावणं दिलं होतं त्याला अक्षरशः रक्ताचे पाणी करून समोर पाऊस पडत असतानाही कशाचीही तमा न बाळगता निवडून दिले. त्याबद्दल मी क्षमा मागतो. मी मतदारसंघातील जनतेची माफी मागतो. शिवसेनाप्रमुखांचा चेहरा, माझा शब्द या भरवशावर या गद्दाराला निवडणूक दिलं होतं. त्यांनी गद्दारी करून आपल्या विश्वासाला काळं फासलं. शेवटी गद्दारच गद्दारी करून गद्दारांच्या कळपात गेला. तीन-चार वर्षांपूर्वी गद्दार शिरोमणी जो बसलाय तिकडे मिंदे, त्याने ४० आमदार फोडले. या विदर्भात जेव्हा बैल पोळा होता तेव्हा या बैलांवर '५० खोके एकदम ओके' असे लिहिले होते.

------------

### फेसबुकवरील नोकरीचे आमिष; केजच्या

आले. त्यानंतर सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्याचे सांगून ४ जून रोजी त्यांना पुण्यावरून विमानाने बँकॉकला पाठविण्यात आले. मात्र, बँकॉकमध्ये पोहोचल्यानंतर स्वप्नील यांना काही अनोळखी व्यक्तींनी म्यानमार सीमेवरील एका अज्ञात ठिकाणी नेले. तेथे त्यांचे पासपोर्टसह सर्व महत्त्वाचे कागदपत्रे काढून घेण्यात आली. त्यानंतर त्यांना दररोज १६ ते १८ तास ऑनलाईन सायबर फसवणुकीचे काम करण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप आहे. काम करण्यास नकार दिल्यास मारहाण, मानसिक छळ तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचे स्वप्नील यांनी पत्नीला व्हॉट्सॲप कॉलद्वारे सांगितले. स्वप्नील यांनी पत्नीला दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या सोबत महाराष्ट्रातील २० ते २५ जणांसह सुमारे ७०० ते ८०० भारतीय नागरिक अशाच प्रकारे अडकले आहेत. विरोध करणाऱ्या दोन ते तीन जणांची हत्या करण्यात आल्याचाही धक्कादायक दावा त्यांनी केला. स्वतःच्या जीवाला गंभीर धोका असल्याचे सांगत त्यांनी कुटुंबीयांकडे सुटकेची याचना केली. या माहितीने हादरलेल्या संगीता काळुंके यांनी तातडीने बीड सायबर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान अधिनियम तसेच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये अज्ञात एजंट आणि संबंधित व्यक्तींविरोधात गुन्हा नोंदवला आहे. या गंभीर आंतरराष्ट्रीय मानवी तस्करी आणि सायबर गुन्ह्याच्या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक निलेश केळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, फेसबुक, व्हॉट्सॲप किंवा अन्य सोशल मीडियावरील परदेशातील आकर्षक नोकरीच्या जाहिरातींवर विश्वास ठेवण्यापूर्वी संबंधित कंपनीची आणि एजंटची शासकीय स्तरावर खातरजमा करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

---------

### घराचा ताब्यानंतरही बिल्डरकडून

या आयोगाने असे निरीक्षण नोंदवले होते की, एकदा का फ्लॅटचा ताबा मिळाला की घर खरेदीदार हा ग्राहक राहत नाही आणि त्यामुळे तो विलंबासाठी नुकसानभरपाई मागू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने हा निर्णय रद्द केला. राष्ट्रीय ग्राहक आयोगाचा हा तर्क ''कायद्याच्या चौकटीत टिकणारा नाही'' असे सांगत न्यायालयाने दिल्लीतील द्वारका येथील २२ वर्षांपूर्वीच्या एका गृहप्रकल्पातील ग्राहकाची याचिका मंजूर केली. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, ''याचिकाकर्त्याची तक्रार केवळ ताबा मिळण्यापुरती नव्हती. फ्लॅट मिळण्यास जो विलंब झाला, त्याबद्दल नुकसानभरपाई मिळणे हा त्याचा हक्क आहे. विलंबाची नुकसानभरपाई हा ताबा मिळण्यापूर्वीच्या कालावधीशी संबंधित विषय आहे. त्यामुळे नंतरच्या काळात फ्लॅटचा ताबा मिळाला, म्हणून ग्राहकाचा नुकसानभरपाई मागण्याचा अधिकार आपोआप संपुष्टात येत नाही.'' या निकालासोबतच न्यायालयाने ग्राहकाने २००५ मध्ये जिल्हा ग्राहक मंचात दाखल केलेली तक्रार पुन्हा जिवंत केली असून, खरोखरच विलंब झाला होता का आणि ग्राहक नुकसानभरपाईस पात्र आहे का, याचा निर्णय एका वर्षाच्या आत घेण्याचे आदेश दिले आहेत.

**ग्राहक कायदाच मोठा**

अनेकदा रिअल इस्टेट कंपन्या आपल्या करारात लवाद कलम टाकतात. म्हणजेच, काही वाद झाल्यास ग्राहक न्यायालयात न जाता खासगी लवादाकडे जावे, अशी अट असते. यावरही न्यायालयाने कडक भूमिका घेतली आहे. १९८६ चा ग्राहक संरक्षण कायदा हा संसदेने नागरिकांना दिलेला अतिरिक्त आणि विशेष अधिकार आहे. त्यामुळे बिल्डर आणि ग्राहकामधील एखादा खासगी किंवा व्यावसायिक करार या कायद्याचे महत्त्व कमी करू शकत नाही. एकदा ग्राहकाने ग्राहक मंचाचे दरवाजे ठोठावले की, करारातील लवादाच्या अटीचे कारण दाखवून ग्राहकाला तिथून हाकलून दिले जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

-------------

### घुले हत्या प्रकरणी सौरव सोनवणेंची

दाखल झाले होते. या चौकशीनंतर एसआयटी प्रमुख आयपीएस व्यंकटराम यांनी माहिती दिली. एसआयटी प्रमुख आयपीएस व्यंकटराम यांनी माध्यमांशी संवाद साधला. पुराव्याच्या आधारे संपूर्ण तपास सुरु आहे. हत्येसाठी वापरलेले साहित्य, चाकू सगळे जप्त केले आहे. सौरव सोनवणे यांना आम्ही हजर राहण्यासंदर्भात नोटीस दिली होती, यानंतर ते हजर झाले. आमच्या सर्व प्रश्नांची त्यांनी उत्तरे दिली आहेत, त्यांचा जबाब नोंदवून घेतला आहे. ते आम्हाला तपासात सहकार्य करत असून, आमचा पुढील तपास सुरु आहे. थार गाडी तिथे गेल्याचे सांगत आहेत. त्या सर्व बाजुने तपास केला जात असल्याची माहिती एसआयटी प्रमुख आयपीएस व्यंकटराम यांनी माध्यमांना दिली. विलास घुले हत्या प्रकरणात फिर्यादीने नोंदवलेल्या पुरवणी जबाबात खासदार बजरंग सोनवणे यांचे सुपुत्र सौरव सोनवणे यांच्या नावाचा उल्लेख केला आहे. या गंभीर प्रकरणामध्ये सौरव सोनवणे यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करत आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. या पार्श्वभूमीवर, बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावँत यांनी पुरवणी जबाबात नाव आल्यामुळे सत्य शोधण्यासाठी एसआयटीने सौरव सोनवणे यांना चौकशीसाठी पाचारण करण्यात येणार असल्याची माहिती दिली होती. तर, ''पोलीस प्रशासन ज्या ज्या वेळी तपासासाठी बोलावेल, त्या त्या वेळी आम्ही पूर्ण सहकार्य करू,'' अशी भूमिका यापूर्वीच खासदार बजरंग सोनवणे आणि सौरव सोनवणे यांनी माध्यमांसमोर स्पष्ट केली होती. केज तालुक्यातील टाकळी येथे २० जूनच्या रात्री हत्येचा कट रचून एका व्यक्तीवर हल्ला करण्यात आला होता. हा वाद सोडवण्यासाठी मध्यस्थी करायला आलेल्या विलास घुले या निष्पाप तरुणावर आरोपींनी जीवघेणा वार केला, ज्यामध्ये त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर बीड जिल्हा संतप्त झाला होता. मुख्य आरोपींच्या अटकेसाठी तब्बल तीन दिवस रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, तसेच विलास घुले यांचा मृतदेह तब्बल नऊ तास पोलीस ठाण्यासमोर ठेवून नातेवाईकांनी प्रशासनाचा निषेध केला होता. पोलिसांनी या प्रकरणात वेगाने तपासाची चक्रे फिरवत विविध ठिकाणाहून एकूण ९ आरोपींना अटक केली आहे.

---------

### राज्यात वादळी

हवामानशास्त्र विभागाने सांगितले आहे. तर मॉन्सूनची सीमा सुरत, इंदूर, मंडला, डाल्टनगंज, मोतिहारी या भागातून जात आहे. विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा गोंदिया, नागपूर,वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांत काही ठिकाणी वादळी पावसाचा येलो अलर्ट इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. तसेच मराठवाड्यातील लातूर, बीड, जालना जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. तर छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, नांदेड, धाराशिव जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी मध्यम पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केली आहे. मध्य महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, जिल्ह्यांत काही ठिकाणी वादळी पावसाची शक्यता असून येलो अलर्टचा इशारा दिला आहे. तर धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. कोकणातील ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता असून येलो अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. तसेच सिंधुदुर्ग, पालघर जिल्ह्यांत काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी हजेरी लावण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.


---------------

### सरसकट कर्जमाफी द्या नाही तर जेलभरो

भवन मध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना दिली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आ. संदीप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी आ. सय्यद सलीम, मोहनराव जगताप, तांदळे अदिंची उपस्थिती होती. यावेळी बोलताना रोहित पवार म्हणाले की ३६ लाख शेतकऱ्यांसाठी पंढरपुरात आम्ही अन्नत्याग आंदोलन केले यावेळी मंत्री गिरीष महाजन यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन मुख्यमंत्र्यांशी बोलणे करून दिले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनापूर्वी यासंदर्भात बैठक घेऊन तोडगा कढू असे आश्वासन दिले होते. मात्र विठ्ठलाच्या दारी दिलेले आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी पाळले नाही. यासाठी आता येत्या २९ जूनला छत्रपती संभाजी नगरच्या केंब्रिज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सन २०२० मध्ये पिक विमा मिळाला नाही. त्यानंतर २०२५ मध्ये ही पिक विमा मिळाला नाही. हा प्रश्न गंभीर असून विमा कंपन्या मोठ्या प्रमाणात नफा कमवत आहेत. मात्र शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे दिले जात नाहीत. शेतीला हमीभाव नसल्याने शेतकरी आज संकटात आहे. त्याला सरसकट कर्जमाफी मिळालीच पाहिजे. सन २०२० मध्ये ८५० कोटीचा विमा बीड जिल्ह्याला मिळणे आवश्यक होते. मात्र तो तिला दिला गेला नाही. या संदर्भात काही शेतकरी नेते न्यायालयात गेले आहेत. सन २०२५ ला अतिवृष्टी होऊनही एकही रुपया जिल्ह्याला मिळाला नाही. काही मोठ्या नेत्यांनी कार्यकर्त्यांना हाताशी धरून पिक विम्या मध्ये भ्रष्टाचार केला. मात्र त्यामुळे ९९% शेतकरी पिक विम्या पासून वंचित राहिले. सरकारने २०२५ मध्ये १७५०० पिक विमा देऊ असे सांगितले होते .राज्यामध्ये ७८ हजार ८०० हेक्टरवर नुकसान झाले होते. मात्र नुकसान भरपाई मिळाली नाही. २४०० कोटी रुपये मिळणे अपेक्षित होते. मात्र सरकारने देशातील शेतकऱ्यांसाठी ३१ हजार कोटी जाहीर करून ११००० कोटी दिले तर पिक विमा कंपन्यांनी ४०० कोटी रुपये दिले. कंपन्यांना ७००० कोटीचा नफा होऊनही शेतकऱ्यांना फसवले जात आहे. कर्जमाफीमध्येही जे नियमित पैसे भरतात त्यांना पन्नास हजार रुपये दिले जातात. त्यांना दोन लाख रुपये दिले जावे अशी मागणी आहे. सरकारच्या या योजनेला बँका दाद देत नाहीत. कर्जमाफी झाल्यानंतरही शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळत नाही. बँक आणि विमा कंपन्या सरकारचे ऐकत नाहीत अशी स्थिती आहे. येत्या २९ तारखेला तीव्र आंदोलन होणार आहे. त्यानंतरही सरकारने दाद दिली नाही तर आगामी काळात जेलभरो आंदोलन केले जाईल. असेही रोहित पवार यांनी सांगितले.

-------------

# खिंडकर बंधूंची हरसुल कारागृहात रवानगी





**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी गुन्हेगारांविरुद्ध धडक मोहीम हाती घेतली आहे. याचाच एक भाग म्हणून, बीड तालुक्यातील बेलवाडी येथील दोन सराईत गुंडांवर कायद्याअंतर्गत कारवाई करून त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत यांच्या सूचनेवरून, पिंपळनेर आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या प्रमुखांनी दादासाहेब बाबुराव खिंडकर (वय ३५) आणि समाधान बाबुराव खिंडकर (वय ३०) या दोघांविरुद्ध अंतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव सादर केला होता. जिल्हादंडाधिकारी विवेक जॉन्सन यांनी २६ जून २०२६ रोजी या प्रस्तावाला मंजुरी देऊन त्यांना कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले होते. दादासाहेब बाबुराव खिंडकर: याच्यावर खुनाचा प्रयत्न, जिवे मारण्याच्या धमक्या, दरोडा, सरकारी नोकऱ्यांवर हल्ला आणि महिलांची बदनामी यांसारखे एकूण ६ गंभीर गुन्हे नोंद आहेत. यापूर्वी २४ एप्रिल २०२६ रोजी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती, तरीही त्याच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. समाधान बाबुराव खिंडकर: याच्यावर खुनाचा प्रयत्न, शासकीय मालमत्तेचे नुकसान, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे आणि सोशल मीडियावर महिलांची बदनामी करणे यांसह ६ गंभीर गुन्हे नोंद आहेत. २७ एप्रिल २०२६ रोजी प्रतिबंधक कारवाई होऊनही तो गुन्हेगारी कृत्ये करत राहिला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक व संबंधित पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी केली आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. २८ जून २०२६


## थोडक्यात




बीड : समता, बंधुता यांचा वारसा जपणारे, लोककल्याणकारी समाजसुधारक, लोक राजे, आरक्षणाचे जनक, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त भाजपा जिल्हा कार्यालय बीड येथे प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील, उपाध्यक्ष सुंदर भाऊ चव्हाण, जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले, ऊसतोड कामगार संघटना जिल्हाध्यक्ष कृष्णा भाऊ तिडके, सोशल मीडियाचे राजू शहाणे, जयदत्त नागरे, दिनेश डेंगे, केशव बडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते..



आष्टी : तालुक्यातील माऊली नगरात अखंड हरिनाम सप्ताहात भागवत कथेचे निरोपन करताना भागवताचार्य भागवत महाराज बादाडे कथेस उपस्थित माजी आमदार शिक्षण महर्षी भीमरावजी धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर नाना, विठ्ठलराव बनसोडे, श्री पुरी महाराज, निळकंठ महाराज तावरे, शिवाजी महाराज कोकणे,दीनकर महाराज तांदळे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, गायक संगीतकार छाया ... शरद रेडेकर

## सेवानिवृत्त मेजर झुंबरराव गीते यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात वास्तव्यास असलेले व मूळ पांगुळगाव येथील रहिवासी, देशसेवा आणि हरिसेवा यांचा सुंदर संगम घडविणारे सेवानिवृत्त मेजर झुंबरराव गीते यांचे शुक्रवारी दुपारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्युसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने आष्टी शहरासह पांगुळगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



भारतीय सैन्यातून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी उर्वरित आयुष्य अध्यात्म, समाजसेवा आणि हरिभक्तीत व्यतीत केले. परमपूज्य यादव बाबा यांच्या दिंडी सोहळ्यात सहभागी होत त्यांनी सलग १५ वर्षे पंढरपूरची वारी केली. ते माऊली सेवा मंडळाचे ज्येष्ठ सदस्य असून वारकरी संप्रदायातील सेवाभावी व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती.

गोड स्वभाव, साधी राहणी आणि सर्वांशी आपुलकीने वागणारे झुंबरराव गीते हे समाजातील अनेकांसाठी प्रेरणास्थान होते. त्यांच्या निधनामुळे वारकरी संप्रदायासह सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर आष्टी शहरातील बसस्थानकाजवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अंत्यसंस्कारावेळी ज्येष्ठ नेते देविदास आबा धस, सतीश आबा शिंदे, किशोर नाना हंबर्डे, आजिनाथराव सानप, ह.भ.प. दिनकरराव तांदळे, सरपंच अशोक मुळे, जितेंद्र शिंदे,माऊली सेवा मंडळाचे पदाधिकारी व सदस्य, माऊली नगरातील महिला-पुरुष, व्यापारी, मित्रपरिवार, नातेवाईक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**देशसेवेपासून हरिसेवेपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास**

भारतीय सैन्यात मेजर म्हणून देशसेवा बजावल्यानंतर झुंबरराव गीते यांनी वारकरी संप्रदायाचा मार्ग स्वीकारला. विठ्ठलभक्ती, दिंडी सेवा, समाजकार्य आणि साधेपणाच्या बळावर त्यांनी अनेकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण केले. त्यांच्या निधनाने समाजाने एक कर्तव्यदक्ष सैनिक आणि सेवाभावी वारकरी गमावला आहे.

# वर्गखोल्यांसाठी ८ कोटी ४२ लाख रुपयांचा निधी द्या

## ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्याकडे डॉ. गणेश ढवळे यांची मागणी





बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांची दुरवस्था पाहता विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत आहे. मोडकळीस आलेल्या इमारती, अपुऱ्या वर्गखोल्या आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

परळी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या एकूण १८८ शाळांपैकी १७ शाळांमधील ४० वर्गखोल्या मोडकळीस आल्या असून, विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता ११ शाळांमध्ये १७ अतिरिक्त वर्गखोल्यांची आवश्यकता आहे. त्यामुळे एकूण २८ शाळांमध्ये ५७ नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी ६ कोटी ८४ लाख रुपये, तर २८ वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी १ कोटी ५८ लाख रुपये असा एकूण ८ कोटी ४२ लाख रुपयांचा निधी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी पर्यावरण मंत्री तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे आणि आमदार धनंजय मुंडे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. ''शाळांच्या इमारती सुरक्षित नसतील तर विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम होतो. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी धोकादायक वर्गखोल्यांचा प्रश्न मार्गी लावून आवश्यक निधी मंजूर करावा,'' अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

# विवाहितेचा छळ करून आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले प्रकरणातील आरोपींची निर्दोष मुक्तता

## ॲड. तेजस नेहरकर यांच्या प्रभावी वकिलीची सर्वत्र चर्चा; साक्षी-पुराव्यांतील त्रुटी न्यायालयाच्या निदर्शनास

बीड । प्रतिनिधी

विवाहित महिलेचा छळ करून आत्महत्या करण्यास प्रवर्त केल्याच्या आरोप प्रकरणात बीड येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने सेशन केस क्र. १०४/२०२४ मध्ये महत्त्वपूर्ण निकाल देत श्रीराम पेटकर आणि प्रीती किरण पेटकर यांची भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांतील सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता केली आहे. या खटल्यात आरोपींच्या वतीने ॲड. तेजस एस. नेहरकर यांनी कायद्याचा सखोल अभ्यास, सर्वोच्च व उच्च न्यायालयातील महत्त्वाच्या निर्णयांचा आधार, तसेच साक्षी-पुराव्यांचे प्रभावी विश्लेषण करत न्यायालयासमोर भक्कम बाजू मांडली. अभियोजन पक्षाकडून आरोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक ठोस पुरावे सादर करण्यात अपयश आल्याचे नमूद करत तसेच आरोपी तर्फे घेण्यात आलेल्या बचावाचे मुद्यावरून न्यायालयाने आरोपींना दिलासा दिला.

बीड शहरातील एका विवाहित महिलेला सन २०१३ पासून लग्न झाले पासूनच

तिचा पती, सासू, दीर व जाऊ शिवीगाळ करून मारहाण करत, शारीरिक, मानसिक त्रास देत होते. तसेच नेहमी घरातून निघून जा असं म्हणत प्रचंड छळ करत होते. तिला दोन मुले झाली त्यांची वय अनुक्रमे १० वर्षे आणि सात वर्षे होती तेव्हा सर्वाचे या छळाला कंटाळून सदर विवाहितेने उंदीर मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्या केली अशी फिर्याद मयत विवाहितेच्या आई ने पती, सासू दीर आणि जाऊ यांच्या विरोधात



शिवाजीनगर पोलिस स्टेशन मध्ये दिली त्यानंतर या प्रकरणात पती, सासू, दीर आणि जाऊ यांच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १९/१०/२०२३ रोजी गुन्हा रजिस्टर नंबर ५६०/२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी पती, सासू, दीर आणि जाऊ यांच्या विरोधात दोषपत्र न्यायालयात सादर केले. त्या प्रकरणाची सुनावणी बीड येथील सत्र न्यायालयात सुरू होती. न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान अभियोजन पक्षाला हे आरोप कायदेशीरदृष्ट्या सिद्ध करण्यासाठी आवश्यक ठोस आणि विश्वासार्ह पुरावे सादर करता आले नाहीत. आरोपींच्या वतीने ॲड. तेजस एस. नेहरकर यांनी न्यायालयात सखोल तयारीसह बाजू मांडली. त्यांनी सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयातील महत्त्वाच्या निर्णयांचा आधार घेत कायदेशीर मुद्दे स्पष्ट केले. तसेच साक्षीदारांच्या उलट तपासणीत समोर आलेल्या विसंगती, पुराव्यांतील त्रुटी आणि प्रकरणातील तथ्यांचे अचूक विश्लेषण न्यायालयासमोर मांडले. या प्रभावी युक्तिवादामुळे अभियोजन पक्षाच्या पुराव्यातील अनेक त्रुटी न्यायालयाच्या निदर्शनास आल्या. त्यानंतर न्यायालयाने केस क्र. १०४/२०२४ मध्ये दिलेल्या निकालात आरोपी श्रीराम पेटकर आणि प्रीती किरण पेटकर यांची भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ, ३०६, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अंतर्गत असलेल्या सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता केली. या निकालानंतर ॲड. तेजस नेहरकर यांच्या प्रभावी वकिलीची कायदे वर्तुळात विशेष चर्चा सुरू आहे. प्रत्येक खटल्याचा सखोल अभ्यास, न्यायालयीन निर्णयांचा योग्य संदर्भ, प्रभावी युक्तिवाद आणि तथ्यांवर आधारित मांडणी ही त्यांची वैशिष्ट्ये मानली जातात. या निकालामुळे त्यांच्या यशस्वी वकिलीमध्ये आणखी एका महत्त्वपूर्ण प्रकरणाची नोंद झाली असून, कायदेशीर अभ्यास आणि प्रभावी न्यायालयीन मांडणीमुळे त्यांनी पुन्हा एकदा आपली छाप पाडल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. या प्रकरणात ॲड तेजस नेहरकर यांना ॲड. गौतम जी नाईकवाडे यांनी अँड. रविराज वी. राठोड ॲड.दत्ता केसकर ॲड. अविनाश रामभाऊ नेहरकर यांनी सहकार्य केले.या प्रकरणातील आरोपींना जामीन होताच सासू व दीर यांनी आमच्या कुटुंबातील एक व्यक्तीने आत्महत्या केली. त्याप्रकरणी आमच्यावर केस झाली त्यामुळे आमची समाजात बदनामी झाली. शिवाय या प्रकरणी न्यायालयात पुन्हा आम्हाला मोठी शिक्षा होती की काय? अशी भीती वाटत होती. या भीतीने आणि बदनामी या दोन गोष्टींमुळे सासू आणि दीर हे प्रचंड खचून गेले होते. सदरील या दोघांनी जास्तच हाय खाल्ली त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

पान ६ वरुन...

### बिबट्याचा हल्ला

चर्चा सुरू होत्या. अनेक नागरिकांना रात्रीच्या वेळी बिबटा दिसल्याचे सांगितले जात असून, शेतात आणि ओढ्यालगतच्या भागात वारंवार बिबट्याच्या पावलांचे ठसे दिसत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे शेतकरी रात्री शेतात जाण्यास घाबरत आहेत. तसेच लहान मुले, महिला आणि पाळीव जनावरे यांच्या सुरक्षिततेबाबतही नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांनी वनविभागाकडे परिसरात तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी केली आहे. तसेच रात्री गस्त वाढवून नागरिकांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वनविभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

### अन्न सुरक्षा अंतर्गत हॉटेल

पिण्याचे पाणी, खाद्यतेलाचा योग्य वापर, अन्न साठवणूक, लेबलिंग, पेस्ट कंट्रोल, वैद्यकीय तपासणी, आवश्यक नोंदी प्रशिक्षण, ऑनलाइन फूड डिलिव्हरीसाठीचे नियम तसेच तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांकडून तपासल्या जाणाऱ्या बाबींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. नियमांचे उल्लंघन झाल्यास होणाऱ्या प्रशासकीय व कायदेशीर कारवाईची माहिती देत प्रत्येक अन्न व्यवसायिकाने कायद्याचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.बैठकीत प्रत्येक अन्न व्यवसायाकडे वैध नोंदणी अथवा परवाना असणे, त्याचे वेळेत नूतनीकरण करणे, स्वच्छता राखणे, सुरक्षित आरो/फिल्टर केलेले पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, दर्जेदार कच्चा माल वापरणे, खाद्यतेलाचा योग्य वापर करणे, नियमित साफसफाई, अग्निसुरक्षा, पाणी तपासणी, पेस्ट कंट्रोल तसेच आवश्यक कागदपत्रे व नोंदी अद्ययावत ठेवण्याबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर महाराष्ट्र व्यापारी महासंघाचे महामंत्री संतोष सोहनी यांनी अन्न व्यवसायिकांनी शासनाच्या नियमांचे पालन करून ग्राहकांचा विश्वास संपादन करण्याचे आवाहन केले. हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष वाय जनार्दनराव यांनी हॉटेल व्यावसायिकांच्या वतीने मनोगत व्यक्त करत अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याची ग्वाही दिली.

शेवटी सर्व अन्न व्यवसायिकांनी ही संकल्पना प्रत्यक्षात आणत सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार अन्न पुरविण्यासाठी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील सर्व नियमांचे प्रामाणिकपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.

### आष्टी-डोईठाण रस्त्यावर

सहाय्यक पोलीस निरीक्षक तसेच विशेष शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांना एकामागून एक फोन केले. मात्र, अत्यंत खेदाची बाब म्हणजे एकाही पोलीस अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने या फोनला प्रतिसाद दिला नाही. पोलिसांच्या या उदासीन आणि ढिम्म कारभारामुळे घटनास्थळावरील नागरिकांमध्ये कमालीचा रोष पाहायला मिळाला.

नागरिकांचा सवाल: सुरक्षा कोणाच्या भरवशावर?

''दिवसाढवळ्या महिलांवर असे हल्ले होत असतील आणि संकटसमयी फोन करूनही पोलीस फोन उचलणार नसतील, तर जनतेने सुरक्षेसाठी कोणाकडे पाहायचे?'' असा संतप्त सवाल आता डोईठाण परिसरातील ग्रामस्थ विचारत आहेत. या भागात पोलिसांची गस्त वाढवावी आणि संबंधित चोरांचा तात्काळ सुगावा लावून त्यांना बेड्या ठोकाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

### रामनाथ खोड यांच्या

रमेश सोमाणी यांच्या मालमत्तेबाबत रामनाथ खोड यांच्या माध्यमातून श्री शनी मंदिर देवस्थानचे सचिव यांनी स्वतंत्र अपीलही दाखल केले होते. सुनावणीदरम्यान ॲड. आर. बी. जाजू यांनी असा युक्तिवाद केला की, एकाच मालमत्तेबाबत एकीकडे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार चौकशी सुरू असताना दुसरीकडे स्वतंत्र अपील चालविणे योग्य नाही. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आलेल्या चौकशी अहवालाचाही त्यांनी आधार घेतला. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्या अहवालात शनी मंदिर देवस्थानच्या मालमत्ता आणि मंत्री कन्स्ट्रक्शनमधील मालमत्ता या स्वतंत्र वेगवेगळ्या असल्याचे नमूद करण्यात आले असून, मंत्री कन्स्ट्रक्शनमधील मालमत्ता शनी मंदिर देवस्थानची नसल्याचा निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे. हा अहवाल आणि इतर उपलब्ध अभिलेखांचा आधार घेत गैरअर्जदारांच्या बाजूने प्रभावी युक्तिवाद करण्यात आला.एकूणच, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, बीड यांनी रामनाथ खोड यांच्या माध्यमातून शनी मंदिर देवस्थानाने रमेश सोमाणी यांच्या मालमत्तेवर केलेला दावा फेटाळत अपील नामंजूर केले. या निर्णयामुळे रमेश सोमाणी यांना मोठा दिलासा मिळाला असून, प्रकरणात गैरअर्जदारांच्या वतीने ॲड. आर. बी. जाजू यांनी काम पाहिले.

### ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी

सकस आहार द्यावा. खेळामुळे जिवनात यशस्वी होता येते. संस्थेच्या वतीने येत्या दोन महिन्यांत सर्व माजी विद्यार्थ्यांचा मेळावा घेण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, गेल्या २६ वर्षापासून संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ अखंडपणे सुरू आहे. आपल्या संस्थेच्या शाळा म्हणजे गुणवंतांची खाण आहे. सर्वच विद्यार्थ्यांना ही संधी प्राप्त होत नाही. गुणवत्ता सहज प्राप्त होत नाही, खुप कष्ट करावे लागते. याप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, प्रा. सागर वाघुले, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. एस. एन. वाघुले, उपप्राचार्य डॉ. संजय धोंडे यांच्यासह पालक विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे निकाल वाचन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते, प्रा. डॉ. संभाजी ओव्हाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. शैलजा कुचेकर यांनी छकेले व उपस्थितांचे प्रा. डॉ. उपप्राचार्य डॉ . बापु खैरे यांनी आभार मानले

## प्रा. प्रदीप रोडे यांना शिक्षणरत्न पुरस्कार प्रदान; मातृभूमी प्रतिष्ठानचा गौरवपूर्ण उपक्रम

बीड । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने योगदान देणारे देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी आय.टी. महाविद्यालय, तुलसी इंग्लिश स्कूल, तुलसी फॅशन डिझायनिंग महाविद्यालय आदी महाविद्यालयाचे संचालक आदरणीय प्रा.प्रदीप रोडे यांना दिनांक २५ जून २०२६ गुरुवार रोजी तुलसी शैक्षणिक संकुल येथे मातृभूमी प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने प्रतिष्ठेचा शिक्षणरत्न पुरस्कार शाल,पुष्पगुच्छ व सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेत आयोजित करण्यात आलेल्या या गौरव सोहळ्यात विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. पुरस्कार प्रदान करताना मातृभूमी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी प्रा. प्रदीप रोडे



यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे सांगितले. समाजाच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान अत्यंत मोलाचे असून अशा कार्यकर्त्यांचा गौरव होणे ही समाजासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी लेक लाडकी अभियानाचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे, सेवानिवृत्त पोस्टमास्तर लक्ष्मण चाटे, सामाजिक कार्यकर्ते दत्ता प्रभाळे, डॉ. लक्ष्मण पवळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी प्रा. प्रदीप रोडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रा. प्रदीप रोडे यांनी हा सन्मान आपल्या सहकारी शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि संस्थेच्या सर्व सहकाऱ्यांचा असल्याची भावना व्यक्त केली. भविष्यातही गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कारमूल्ये आणि समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून समाजात सकारात्मक कार्याला प्रोत्साहन देण्याचे महत्त्व या सोहळ्यात अधोरेखित करण्यात आले.

## युनिक क्युरियस किड्समध्ये सरस्वती पाटी पूजन व अक्षरपूजन संस्कार सोहळा उत्साहात संपन्न

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शिक्षणाच्या शुभारंभाला भारतीय संस्कृतीतील संस्कारांची जोड मिळावी या उद्देशाने युनिक क्युरियस किड्स विद्यालयात सरस्वती पाटी पूजन व अक्षरपूजन संस्कार सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात दीडशेहून अधिक पालक व चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

भारतीय परंपरेनुसार अनेक पालक आपल्या मुलांच्या शैक्षणिक जीवनाची सुरुवात बासर येथील श्री ज्ञान सरस्वती मंदिरात जाऊन पाटी पूजन व अक्षराभ्यास करून करतात. मात्र विविध कारणांमुळे सर्वच पालकांना बासर येथे जाणे शक्य होत नाही. अशा पालकांच्या भावना आणि मुलांच्या शिक्षणाची सुरुवात एका पवित्र संस्काराने व्हावी, या उद्देशाने युनिक क्युरियस किड्सच्या संचालिका पूजा सारडा मॅडम यांनी दरवर्षी हा संस्कार सोहळा आयोजित करण्याची परंपरा सुरू ठेवली आहे. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसमवेत सहभागी होत सरस्वती पूजन, पाटी पूजन व अक्षरपूजन विधी पार पाडला. बासर येथे ज्या पद्धतीने विधिवत पूजा केली जाते, त्याच पद्धतीने विद्यालयाच्या प्रांगणात हा संस्कार पार पाडण्यात आला. या प्रसंगी आदरणीय गुरूजी विजय पाठक महाराज यांनी



अत्यंत विधीवत व सुंदररीत्या मुलांकडून अक्षरपूजन संस्कार करून घेतला तसेच शिक्षणाचे महत्त्व आणि संस्कारांची गरज याविषयी मार्गदर्शन केले. ज्ञानदेवता माता सरस्वतीचे आशीर्वाद लाभून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची मंगलमय सुरुवात व्हावी, त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शिक्षणाची पायाभरणी संस्कारपूर्वक व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे संचालिका पूजा सारडा मॅडम यांनी सांगितले. या संस्कार सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे आदरणीय विजय पाठक महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली बासर येथील परंपरेनुसार करण्यात आलेले विधीवत सरस्वती पूजन व अक्षरपूजन. त्यामुळे पालकांनाही आपल्या मुलांच्या शिक्षणाची सुरुवात संस्कारमय वातावरणात करण्याचा अनोखा अनुभव मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी युनिक क्युरियस किड्सच्या संपूर्ण शिक्षक व कर्मचारी वर्गाने विशेष परिश्रम घेतले. पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत अशा संस्कारमूल्य जपणाऱ्या कार्यक्रमांची गरज व्यक्त केली.

# छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय पिंपरखेड येथे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

वडवणी । प्रतिनिधी

छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड या ठिकाणी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.. प्रथमता मान्यवर मंडळीच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहारने पूजन करण्यात आले ..अनेक मान्यवर मंडळींनी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमा अभिवादन केले.. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ग्रंथपाल सौ शीलाताई सुखदेव यांनी केले.. छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाचे सचिव प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्याबद्दल सविस्तर माहिती सांगितली ..छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या काळामध्ये फार मोठे शैक्षणिक काम करून समाजाला एक नवीन दिशा देण्याचं काम केलेलं आहे ..छत्रपती शाहू महाराज यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करून गोरगरिबांना शिक्षण मिळावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून त्यांनी आपल्या राज्यामध्ये सर्व शाळा खुल्या केलेल्या होत्या.. ठिकठिकाणी स्वखर्चांमधून शाळा बांधण्याचे काम छत्रपती शाहू महाराज यांनी केलेले आहे ..डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सारख्या विद्वानाला मदत करण्याचं काम छत्रपती शाहू महाराज यांच्या माध्यमातून झालेलं आहे ..डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराज यांचे अतिशय घनिष्ठ संबंध आलेले आहेत ..शाहू महाराज हे जरीही राजे असले तरी त्यांची वागणूक सर्व सामान्य माणसांमध्ये मिसळणारी होती ..त्यांनी समता प्रस्थापित करण्याचे काम केलेलं आहे ..आरक्षणाचे जनक म्हणून त्यांची संपूर्ण भारत देशामध्ये ओळख आहे.. प्रत्येकाला आरक्षण मिळाले पाहिजे ,,बरोबरीचा वाटा प्रत्येकाला मिळाला पाहिजे.. प्रत्येक व्यक्ती हा समान संधीने समान वागणूक देऊन त्याचा सन्मान करणे गरजेचे आहे अशी छत्रपती शाहू महाराज यांची धारणा होती.. छत्रपती शाहू महाराजांनी अनेक बहुजन समाजातील आणि अस्पृश्य जातीतील लोकांना व्यवसाय करण्याची संधी उपलब्ध करून दिलेली होती ..त्यामुळे खरं राज्य छत्रपती शाहू महाराज यांच्या काळामध्ये उदयास आलेलं होतं.. अशा छत्रपती शाहू महाराज यांचे विचार विद्यार्थ्यांनी ,,समाजातील समजदार माणसांनी आत्मसात करावे ..त्यांच्या विचाराने जावे.. त्यांच्या विचारांची पेरणी संपूर्ण समाज बांधवात करावी .. एक आदर्श राजाची शिकवण जी की शिक्षण हे अत्यावश्यक आहे आणि ते प्रत्येकाने घेतलं पाहिजे ही आठवण मनात ठेवून आपलं जीवन जगावे ..अशी भावना सचिव प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी व्यक्त केले.. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सलोनी खळगे यांनी केले.. आलेल्या विद्यार्थ्यांना अल्प उपहाराचे वाटप करण्यात आले.. व अतिशय उत्साह पूर्ण वातावरणामध्ये कार्यक्रमाची सांगता झाली.



# अवकाळीच्या नुकसानीपोटी ३३४ कोटी निधी मंजूर

मुंबई / प्रतिनिधी

कडाक्याची थंडी आणि अवेळी आलेल्या पावसामुळे नुकसान झालेल्या कोकणातील १.३४ लाख आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना राज्य सरकारने २०९ कोटी १० लाख ६ हजार रुपये, तसेच राज्यात विविध भागांत झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसानीपोटी १२५ कोटी ८८ लाख रुपयांच्या मदतीला मंजुरी विधानसभेत दिली. एकूण ३३४ कोटींची मदत तत्काळ वितरित करण्याचे आदेश दिले आहेत.

ऑक्टोबर २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत नुकसानग्रस्त आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना ही मदत दिली जाणार आहे. पिकांच्या नुकसानीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांनुसार ही मदत मंजूर करण्यात




आली आहे. कोकण विभागातील एकूण १ लाख ३४ हजार २५१ शेतकरी या मदतीस पात्र ठरले आहेत. बाधित क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ ९२ हजार ३४२.७८ हेक्टर आहे. कोकणातील आंबा, काजू आणि इतर फळपिकांसाठी प्रसिद्ध असलेल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना सर्वाधिक फटका बसला आहे. रत्नागिरी जिल्ह्यात ५२ हजार ६२८ शेतकरी बाधित झाले असून, सुमारे ९८.४४ कोटी मदत मंजूर झाली आहे. तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४२ हजार ३२२ शेतकऱ्यांना ७९.०६ कोटी रुपयांची मदत मिळणार आहे. तसेच गडचिरोली, सातारा, सोलापूर, सांगली जिल्ह्यांतील नुकसानीपोटी चार कोटी १ हजार, अकोला, बुलडाणा, भंडारा जिल्ह्यांसाठी १३ कोटी २७ लाख ९८ हजार, नागपूर, नाशिक, ठाणे, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतील नुकसानीपोटी १०६ कोटी ५६ लाख, बीड, लातूर, छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यासाठी २ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. ही मदत डीबीटी प्रणालीद्वारे लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश दिले आहेत.

## भदावरी म्हशीच्या दुधात असते १४ ते १८ टक्के फॅट; वाचा किती देते दूध?

राज्यासह देशामध्ये ग्रामीण भागात दूध व्यवसायामुळे शेतकऱ्यांची चांगली भरभराट झाली आहे. शेतकरी प्रामुख्याने त्या-त्या भागात, संबंधित वातावरणानुसार म्हशींच्या जातींचे पालन करताना दिसतात. देशात म्हशींच्या अनेक जाती आहेत. त्यातीलच एक जात म्हणजे भदावरी म्हैस होय. या म्हशीची विशेषतः म्हणजे तिच्या दुधामध्ये मोठ्या प्रमाणात फॅट असते. ज्यामुळे अधिकचा दर मिळवण्यासाठी शेतकऱ्यांकडून या जातीच्या म्हशीला विशेष मागणी असते. या जातीच्या म्हशीच्या दुधामध्ये जवळपास १४ ते १८ टक्क्यांपर्यंत फॅट असते. ज्यामुळे ती इतर जातींपेक्षा वेगळी ठरते.

भदावरी म्हशीचे मूळस्थान : भदावरी जातीची म्हैस ही प्रामुख्याने आग्रा, इटावा, मुरैना, ग्वालियर या उत्तर-मध्य भारतातील जिल्ह्यांमध्ये आढळते. या सर्व जिल्ह्यांच्या भागाला पूर्वी 'भदावर' नावाने ओळखले जात होते. ज्यामुळे या म्हशीचे नाव 'भदावरी म्हैस' असे पडले. या प्रजातीची म्हैस ही प्रामुख्याने लालसर तपकिरी रंगाची असते. तर तिचा बांधा हा मध्यम आकाराचा असतो. पुढील बाजूने ही म्हैस बारीक तर मागील बाजूने काहीशी फुगीर असते. या म्हशीची शिंगे ही सपाट, जाड व मागे तसेच आतील बाजूस वळलेली असतात. या प्रजातीच्या रेड्याचे वजन हे ४०० ते ५०० किलो तर म्हशीचे वजन हे ३५० ते ४०० किलो इतके असते.

किती दूध देते? भदावरी जातीची म्हैस ही दररोज ६ ते ८ लिटर दूध देण्यास सक्षम आहे. भदावरी म्हैस ही मुऱ्हा म्हशीपेक्षा कमी दूध देते. मात्र, ती तूप निर्मितीसाठी सरस ठरते. विशेष म्हणजे जगातील कोणत्याही म्हशीच्या दुधात इतक्या मोठ्या प्रमाणात फॅट नसते. या म्हशीच्या दुधामध्ये सर्वाधिक १४ ते १८ टक्के फॅट आढळते. तसेच ही म्हैस आपल्या एकूण प्रजननकाळात सरासरी १३००-१५०० लिटर दूध देण्यास सक्षम मानली जाते.



किती आहे किंमत? भदावरी म्हशीच्या दुधामध्ये मोठ्या प्रमाणात फॅट असल्याने, आता अनेक शेतकऱ्यांच्या मनात ही म्हैस खरेदी करण्याचा विचार मनात आला असेल. तसेच या म्हशीची किंमत किती असेल. हा विचार देखील शेतकऱ्यांचा मनात आला असेल. तर ही म्हैस प्रामुख्याने शेतकऱ्यांना ६० ते ७० हजारांपर्यंत मिळू शकते. शेतकऱ्यांनी शक्यतो कोणत्याही ऑनलाईन प्रलोभनांना बळी न पडता, सुरक्षित मार्गाने जनावरांची खरेदी करावी.

काय आहेत 'या' म्हशीची वैशिष्ट्ये : भदावरी प्रजातीच्या म्हशीचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही म्हैस कोणत्याही प्रकारच्या वातावरणात जुळवून घेते. ज्यामुळे देशातील प्रत्येक राज्यामध्ये ही म्हैस पाळणे सहजशक्य आहे. दूध उत्पादकांना म्हशीच्या दुधाला अधिक फॅट मिळवून, दुग्ध व्यवसायात आर्थिक भरभराट करून घ्यायची असेल. तर त्यांच्यासाठी ही म्हैस उत्तम पर्याय ठरणार आहे. या प्रजातीच्या म्हशीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिला तुलनेने कमी चारा लागतो. असे असूनही ती गुणवत्तापूर्ण दूध देण्यास महत्वपूर्ण ठरते. त्यामुळे या म्हशीच्या चाऱ्यावर शेतकऱ्यांचा खर्च कमी होतो. याशिवाय या प्रजातीच्या म्हशीची रोगप्रतिकारशक्ती उत्तम असते. तसेच ती अत्यंत कठीण परिस्थितीतही तग धरून राहते.

## पाण्याची भूजल पातळी वाढवण्यासाठी विहीर पुनर्भरण तंत्र

सध्या पिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी विहीर आणि बोरवेल मधून अमर्यादित स्वरूपात पाण्याचा उपसा करण्यात येतो.त्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात खालावत आहे.ज्या वेगाने पाण्याचा उपसा होतो त्याच वेगाने पाण्याचे पुनर्भरण करण्यासाठी प्रयत्न केले जात नाही.

सध्या पिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी विहीर आणि बोरवेल मधून अमर्यादित स्वरूपात पाण्याचा उपसा करण्यात येतो.त्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात खालावत आहे.ज्या वेगाने पाण्याचा उपसा होतो त्याच वेगाने पाण्याचे पुनर्भरण करण्यासाठी प्रयत्न केले जात नाही. परिणामी भूजल साठा कमी होऊन विहीर आणि बोरवेल चे पाणी पातळी सुद्धा लक्षणीयरीत्या घटली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. या समस्येवर सर्वोत्तम उपाय म्हणजे जलपुनर्भरण हे होय. या लेखामध्ये आपण विहीर पुनर्भरणाचे तंत्र जाणून घेणार आहोत.

विहीर पुनर्भरणाचे तंत्र : या तंत्रामध्ये पावसाळ्यात शेतजमीनीतून वाहणारे पावसाचे पाणी एकत्रितपणे वळवून विहिरीजवळ आणावे.या वळवलेल्या पाण्याचा उपयोग विहिरी पुनर्भरण यासाठी करावा. यामध्ये महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे वाहणारे पाणी सरळ विहिरीत सोडू नये.कारण त्यामुळेवाहणाऱ्या पाण्यासोबत आलेली माती आणि गाळ विहिरीत साठू शकतो. कोरडवाहू शेती संशोधन केंद्राने विहीर पुनर्भरण तंत्रज्ञान विकसित केले आहे. या तंत्रामध्ये



दोन प्रकारच्या गाळण यंत्रणा आहेत. त्यामुळे पावसाच्या पाण्याबरोबर येणारा गाळ अडविला जातो व शुद्ध पाणी विहिरीत सोडले जाते. शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या रचनेनुसार व उतारानुसार पावसाचे वाहते पाणी गाळण यंत्रणेकडे वळवावे. शेतातील पाणी सरळ टाक्यात घेण्याऐवजी टाक्या बाहेर एक साधा खड्डा करून त्यामध्ये दगड गोटे,रेती भरावी. त्यामधून एक पीव्हीसी पाईप टाकून त्या पाइपने पाणी प्रथम प्राथमिक गाळण यंत्रणेत घ्यावे. शेता कडील चारी द्वारे वाहणारे पाणी प्रथम प्राथमिक गाळण यंत्रणेत घ्यावे. मुख्य गाळण यंत्रणेचा अलीकडील दीड मीटर बाय एक मीटर बाय १ मीटर आकाराचे दुसरी टाकी बांधावी.त्याला प्राथमिकगाळणयंत्रणा म्हणतात. शेतातून वाहत येणारे पाणी प्रथम या टाकीत घ्यावी. तेथे जड गाळ खाली बसतो आणि थोडे गढूळ पाणी पीव्हीसी पाईप च्या माध्यमातून किंवा खाचेद्वारे मुख्य कारण गाळणयंत्रणात सोडावे.

मुख्य गाळण यंत्रणा : विहीर पुनर्भरण मॉडेलच्या दुसऱ्या भागाला मुख्य गाळण यंत्रणा असे म्हणतात. यंत्रणा विहिरीपासून दोन ते तीन मीटर अंतरावर बांधावे. यासाठी दोन मीटर लांब बाय दोन मीटर रुंद आणि दोन मीटर खोल खड्डा करावा. या खड्ड्याला आतून सिमेंट विटांचे बांधकाम करून टाकी सारखे बांधून घ्यावे. यात मुख्य गाळण यंत्रणा च्या खालील भागातून चार इंच व्यासाचा पीव्हीसी पाईप विहिरीत सोडावा. या टाकीत ३० सेंटीमीटर उंचीपर्यंत मोठे दगड, ३० सेंटीमीटर उंचीपर्यंत छोटे दगड आणि त्यावर ३० सेंटीमीटर जाडीचा वाळूचा थर टाकावा. असे ९० सेंटिमीटर जाडीचे गाळन थर असावे. त्यावरील साठ सेंटीमीटर भागात पाणी साठते. या गाळण यंत्रणेमार्फत पाणी गाळले जाऊन विहिरीत सोडावे.

## सोयाबीन न उगवण्याची कारणे आणि उपाय

सोयाबीनचे भरघोस आणि दर्जेदार उत्पादन मिळविण्यासाठी केवळ चांगले बियाणे वापरणे पुरेसे नसून बीज प्रक्रिया आणि संतुलित खत व्यवस्थापन या दोन बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या टप्प्यांकडे दुर्लक्ष केल्यास उगवण क्षमता कमी होणे, सुरुवातीच्या अवस्थेत रोग व किडींचा प्रादुर्भाव वाढणे आणि उत्पादनात घट होणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात, असा इशारा कृषी तज्ज्ञांनी दिला आहे. खरीप हंगामातील सोयाबीनपेरणीचा कालावधी सुरू असताना शेतकऱ्यांनी शास्त्रीय पद्धतींचा अवलंब केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ साधता येऊ शकते, असे मत जिल्हा विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे यांनी व्यक्त केले.

पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया का आवश्यक? सोयाबीन पिकाच्या सुरुवातीच्या वाढीच्या टप्प्यात अनेक बुरशीजन्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक मानले जाते. बीज प्रक्रियेमुळे बियाण्यांचे रोगांपासून संरक्षण होते, उगवण क्षमता सुधारते आणि पिकाची सुरुवातीची वाढ अधिक जोमदार होते. याशिवाय पिकाला आवश्यक असलेल्या जैविक घटकांचाही पुरवठा होतो.

एफआयआर पद्धतीने बीज प्रक्रिया करण्याची शिफारस : कृषी तज्ज्ञांनी सोयाबीन पेरणीपूर्वी एफआयआर पद्धतीने बीज प्रक्रिया करण्याचा सल्ला दिला आहे.या पद्धतीमध्ये खालील क्रमाने प्रक्रिया



केली जाते.

बुरशीनाशकाचा वापर : सर्वप्रथम बियाण्यांवर शिफारस केलेल्या बुरशीनाशकाची प्रक्रिया केली जाते. यामुळे बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण मिळते. कीटकनाशक प्रक्रिया : त्यानंतर कीटकनाशकाची प्रक्रिया करून सुरुवातीच्या अवस्थेतील किडींच्या हल्ल्यापासून संरक्षण केले जाते. जैविक जीवाणू संवर्धकांचा वापर : शेवटच्या टप्प्यात रायझोबियम आणि पीएसबी (फॉस्फेट विद्रावक जीवाणू) यांसारख्या जैविक जीवाणू संवर्धकांचा वापर केला जातो. यामुळे मुळांवर गाठींची संख्या वाढते, नत्र स्थिरीकरणास मदत मिळते आणि पिकाची वाढ अधिक सक्षम होते.

खत व्यवस्थापनाची गरज : शेतकरी अनेकदा सर्वसाधारण शिफारशींनुसार खतांचा वापर करतात. मात्र तज्ज्ञांच्या मते माती परीक्षणाच्या अहवालावर आधारित खत व्यवस्थापन अधिक फायदेशीर ठरते. मातीतील उपलब्ध अन्नद्रव्यांचा अभ्यास करून नत्र, स्फुरद आणि पालाश यांची योग्य मात्रा निश्चित केल्यास खतांचा कार्यक्षम वापर होतो आणि खर्चही कमी होतो. रासायनिक खतांसोबत सेंद्रिय खतांचा वापर केल्यास जमिनीची सुपीकता टिकून राहते. विशेषतः शेणखताचा वापर केल्याने जमिनीची भौतिक रचना सुधारते. पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून निघते. सूक्ष्मजीवांची संख्या वाढते. दीर्घकालीन उत्पादन क्षमता टिकून राहते.

एल निनोच्या पार्श्वभूमीवर सावध राहण्याचा सल्ला : यंदा संभाव्य एल निनो परिस्थितीमुळे पावसाचे वितरण असमान राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. या जोखमीचा परिणाम कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी एकापेक्षा अधिक सोयाबीन जातींची निवड करावी, असा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे. विविध कालावधीच्या आणि हवामान बदलांना सहनशील असलेल्या जातींची निवड केल्यास उत्पादन जोखीम कमी करता येऊ शकते.

उत्पादन वाढीसाठी चार महत्त्वाची सूत्रे : एफआयआर पद्धतीने बीज प्रक्रिया करा. रायझोबियम व पीएसबी जीवाणू संवर्धकांचा वापर करा. माती परीक्षणानुसार खतांची मात्रा ठरवा. शेणखतासह सूक्ष्म अन्नद्रव्यांचा संतुलित वापर करा.

शास्त्रीय शेतीच यशाची गुरुकिल्ली : बीज प्रक्रिया हा खर्च नसून भविष्यातील उत्पादनासाठी केलेली गुंतवणूक आहे. त्याचप्रमाणे माती परीक्षणावर आधारित संतुलित खत व्यवस्थापनामुळे उत्पादनात वाढ होतेच, शिवाय जमिनीचे आरोग्य दीर्घकाळ चांगले राहते. सोयाबीन उत्पादकांनी शास्त्रीय शेती पद्धतींचा अवलंब केल्यास उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवत अधिक दर्जेदार आणि भरघोस उत्पादन मिळवणे शक्य होणार आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३८ : इंग्लंडची राणी व्हिक्टोरियाचा राज्याभिषेक झाला.
१८४६ : ॲडॉल्फ सॅक्स याने पॅरिस, फ्रान्समधे 'सॅक्सोफोन' या वाद्याचे पेटंट घेतले.
१९२६ : गोटलिब डेमलर आणि कार्ल बेन्झ यांनी त्यांच्या दोन कंपन्यांचे एकत्रीकरण करून मर्सिडीज-बेंझची स्थापना केली.
१९७२ : दुसऱ्या भारत-पाक युद्धानंतर सिमला परिषदेस प्रारंभ
१९७८ : अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयाने महाविद्यालयातील प्रवेशात आरक्षण बेकायदा ठरवले.
१९८१ : चीनने कैलाश मानसरोवर यात्रा करण्यासाठी सडक मार्ग उघडला.
१९८६ : अविवाहित मुलींनाही प्रसूती रजा देण्यासाठी केंद्र सरकारने कायदा केला.
१९९४ : विश्वकरंडक फूटबॉल स्पर्धेत रशियाच्या ओलेग सेलेन्को याने कॅमेरुनविरुद्ध पाच गोल करुन ऐतिहासिक कामगिरी केली. यापूर्वी एकाच सामन्यात चार गोल करण्याची कामगिरी नऊ खेळाडूंनी केली होती.
१९९५ : वाघांना शिकाऱ्यांपासून वाघांचा बचाव करण्यासाठी व त्यांना आश्रय देण्यासाठी मध्यप्रदेश राज्याला 'टायगर्स स्टेट' म्हणून घोषित करण्यात आलं.
१९९७ : मुष्टियुद्धात इव्हान्डर होलिफिल्डच्या कानाचा चावून तुकडा तोडल्यामुळे माईक टायसनला निलंबित करुन होलिफिल्डला विजेता घोषित करण्यात आले.
१९९८ : संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कविषय्क सार्वत्रिक जाहीरनाम्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४९१ : हेन्री (आठवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: २८ जानेवारी १५४७)
१७१२ : रुसो फ्रेन्च विचारवंत, लेखक व संगीतकार (मृत्यू: २ जुलै १७७८)
१८८३ : साली भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते आणि महात्मा गांधी काशी विद्यापीठाचे संस्थापक तसचं, हिंदी वृत्तपत्र "दैनिक आज" चे संस्थापक शिवप्रसाद गुप्त यांचा जन्मदिन.
१९२१ : नरसिंह राव भारताचे ९ वे पंतप्रधान, वाणिज्य व उद्योगमंत्री (मृत्यू: २३ डिसेंबर २००४)
१९२८ : बाबूराव सडवेलकर चित्रकार, कलासमीक्षक, महाराष्ट्राचे कलासंचालक (मृत्यू: २३ नोव्हेंबर २०००)
१९३४ : रॉय गिलख्रिस्ट कसोटी क्रिकेटमधील भेदक वेगवान गोलंदाज म्हणून कारकीर्द गाजवलेले वेस्ट इंडीजचे वादग्रस्त कसोटीपटू (मृत्यू: १८ जुलै २००१)
१९३७ : डॉ. गंगाधर पानतावणे साहित्यिक व समीक्षक
१९७० : मुश्ताक अहमद पाकिस्तानी क्रिकेटपटू व प्रशिक्षक
१९७६ : पद्मश्री पुरस्कार व अर्जुन पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट भारतीय नेमबाज जसपाल राणा यांचा जन्मदिन.
१९९५ : पद्मश्री पुरस्कार व अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय पॅरालंपिक उंच उडी खेळाडू मरियप्पन थान्गावेलु यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३६ : जेम्स मॅडिसन अमेरिकेचे चौथे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १६ मार्च १७५१)
१९९० : कवी प्रा. भालचंद खांडेकर यांचे निधन.
१९७२ : प्रसंत चंद्र महालनोबिस भारतीय संख्याशास्त्राचे जनक, 'इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्युट' चे संस्थापक (जन्म: २९ जून १८९३)
१९८७ : पं. गजाननबुवा जोशी शास्त्रीय गायक (जन्म: ३० जानेवारी१९११)
१९९९ : रामचंद्र विठ्ठल तथा रामभाऊ निसळ स्वातंत्र्यसैनिकांचे नेते व झुंजार पत्रकार (जन्म:)
२००० : विष्णू महेश्वर ऊर्फ 'व्ही. एम.' तथा दादासाहेब जोग उद्योजक (जन्म: ६ एप्रिल १९२७)
२००६ : संत साहित्यकार, समीक्षक, वक्ते डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे निधन.
२००७ : जपानच्या पूर्व पंतप्रधान कीची मियाजावा यांचे निधन.
२००९ : भारतीय दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक ए. के. लोहितदास यांचे निधन. (जन्म: ६ मे १९५५)

## भेंडीच्या या जाती देतात भरघोस उत्पादन



उत्पन्न वाढवण्यासाठी शेतकरी हंगामानुसार त्यांच्या शेतात भाजीपाल्याची शेती करतात. भेंडीच्या ज्या सुधारित जातींमध्ये पुसा सावनी, परभणी क्रांती, अर्का अनामिका, पंजाब पद्मिनी आणि अर्का अभय या जाती महत्वाच्या आहेत. या सर्व जाती कमी वेळात चांगले उत्पादन देण्यास सक्षम आहेत. या जातींची मागणी वर्षभर बाजारात असते. भेंडीच्या या जातींची लागवड देशातील अनेक राज्यांमध्ये केली जाते. भेंडीच्या ५ सुधारित जातींमध्ये जीवनसत्त्वे, फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजे तसेच कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि लोह मुबलक प्रमाणात असते. यामुळे या भेंडीच्या जातींबद्दल आज आम्ही तुम्हाला माहिती देणार आहोत.

पुसा सावनी : भेंडीची ही सुधारित जात उन्हाळा, थंडी आणि पावसाळ्यात सहज पिकवता येते. पुसा सावनी जातीची भेंडी पावसाळ्यात सुमारे ६० ते ६५ दिवसांत तयार होते. परभणी क्रांती : भेंडीची ही जात पिटा रोगास प्रतिरोधक मानली जाते. जर शेतकऱ्यांनी बियाणे शेतीत लावले तर त्यांना सुमारे ५० दिवसांत फळे येऊ लागतात. परभणी क्रांती जातीचा रंग गडद हिरवा असतो आणि तिची लांबी १५-१८ सेमी असते.

अर्का अनामिका वाण : ही जात यलो मोझॅक विषाणू रोगाशी लढण्यास सक्षम आहे. या जातीच्या भेंडीमध्ये केस आढळत नाहीत आणि त्याची फळे अतिशय मऊ असतात. ही जात उन्हाळा आणि पावसाळ्यात चांगले उत्पादन देण्यास सक्षम आहे. पंजाब पद्मिनी : भेंडीची ही जात पंजाब विद्यापीठाने विकसित केली आहे. या प्रकारची भेंडी सरळ आणि गुळगुळीत असते. त्याच वेळी जर आपण त्याच्या रंगाबद्दल बोललो तर ही भेंडी गडद रंगाची आहे. अभय : ही जात पिवळ्या मोझॅक विषाणू रोगाशी लढण्यास सक्षम आहे. अर्का अभय जातीची भेंडी शेतात लागवड केल्यावर काही दिवसात चांगले उत्पादन देते. या जातीची भेंडीची झाडे १२०-१५० सेमी उंच आणि सरळ असतात.

# प्रशासक व ग्रामपंचायत अधिकाऱ्याने बोगस बिल काढून केला लाखोंचा अपहार:चौकशीची मागणी

मंठा। प्रतिनिधी

तालुक्यातील बहुचर्चित ग्रामपंचायत खोराड सावंगी येथील प्रशासक मिलन श्रीराम जाधव आणि ग्रामपंचायत अधिकारी ए. टी. चव्हाण संगनमताने बोगस बिले दाखवून जवळपास चार लाख रुपयाचा अपहार केल्याची तक्रार भुरा नाईक पवार यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी जि प जालना व गटविकास अधिकारी पंचायत समिती मंठा यांना निवेदन देण्यात आले असून तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी व्ही आर आढे यांच्या कार्यकाळातील १५ व्या वित्त आयोगाची ग्रामपंचायतच्या खात्यावर असलेली जवळपास चार लाख रुपयांची रक्कम प्रशासक मिलन श्रीराम जाधव आणि सध्याचे ग्रामपंचायत अधिकारी ए टी चव्हाण यांनी संगणमत करून बोगस बिलांच्या आधारे लाखो रुपयाचा अपहार केला आहे.

प्रशासक मिलन श्रीराम जाधव यांनी आई-वडील व भावाच्या नावाने १५ व्या वित्त आयोगाची रक्कम उचलल्याची तक्रार करण्यात आली आहे. तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी व्हि.आर. आढे यांनी पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम केले होते. त्यातील मोटर संचचे बिल देणे बाकी होते. ग्रामपंचायत अधिकारी व्ही आर आढे यांची बदली झाल्यामुळे त्यांच्या जागी रुजू झालेले ग्रामपंचायत अधिकारी ए.टी. चव्हाण यांनी प्रशासक मिलन श्रीराम जाधव यांच्यासोबत संगणमत करून मोटार संचाची व इतर साहित्याची बोगस बिले कुठलाही ठराव न घेता अपहार केला असून प्रशासक मिलन श्रीराम जाधव यांनी आई वडील व भावाच्या नावाने शासकीय रक्कम उचलून घेऊन जवळपास चार लाख रुपयाचा अपहार केला आहे. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायत अधिकारी ए. टी. चव्हाण यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर येथील ग्रामस्थ भुरा नाईक पवार, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी व्ही आर आडे नारायण पवार, संजय राठोड, तुषार राठोड, रामा चव्हाण, पवन राठोड, समाधान राठोड यांच्यासह अनेक गावकऱ्यांच्या सह्या आहेत. दरम्यान, ग्रामपंचायत अधिकारी ए.टी. चव्हाण यांना १ जून रोजी खोराडसावंगी ग्रामपंचायतचा प्रशासक पदाचा पदभार देण्याबाबत आदेश मिळताच केवळ पंधरा दिवसाच्या आत त्यांनी सुमारे चार लक्ष रुपयाचा अपहार केल्याने त्यांचा पदभार इतर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना देण्यात यावा व त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## समृद्धी योजनेच्या कामाची चौकशी करण्याची मागणी ;ग्रामविकासमंत्री यांना निवेदन

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील किर्ला येथील संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या सिमेंट रस्ता व भूमिगत गटाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे पदाधिकारी वसंत मुंडे यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मात्र, मंत्रीस्तरीय आदेशानंतरही दीड महिना उलटून चौकशी न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात राजेश श्रीराम चव्हाण जालनेकर यांच्या निवेदनानुसार किर्ला येथील तांड्यावर सिमेंट रस्ता व भूमीगत नालीसाठी सुमारे २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. काम सुरू असतानाच दर्जाबाबत ग्रामस्थांनी वारंवार आक्षेप घेतले. निकृष्ट झालेले काम पुन्हा दर्जेदार करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, त्यानंतर कोणतीही सुधारणा करण्यात आली नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. याप्रकरणात संबंधित सरपंच, ग्रामसेवक, कंत्राटदार यांच्यासह बिल मंजूर करणारे कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, गटविकास अधिकारी, तत्कालीन ग्रामसेवक आणि समाजकल्याण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली होती. तथापि, ग्रामविकास मंत्र्यांच्या आदेशानंतरही चौकशीला विलंब होत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे पदाधिकारी वसंत संपतराव मुंडे यांनी संबंधितांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

## कागदपत्रांची व गट नंबर बदलत फेरफार करुन जांभुळवाडी वस्ती शाळेचे बेकायदेशीर बांधकाम !

### तत्कालीन शिक्षक,ग्रामसेवक,सरपंच आणि उपसरपंच यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी !

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील एकनाथवाडी येथील जांभुळवाडी ही वस्ती शाळा शाळा उघडल्याचा दिनांक १५ जून २०२६ पासून पंधरा दिवसापासून कुलूप लावल्याने बंद अवस्थेत असून विद्यार्थ्यांना जांभुळवाडी येथील रस्त्यावर बसावे लागत असल्याने संतापाची लाट निर्माण झाली असून धक्कादायक बाब म्हणजे २००० वर्षी गृहस्थ सुदाम नामदेव खेडकर यांनी जांभुळवाडी येथील वस्ती शाळेसाठी स्वतःच्या मालकीची तीन गुंठे जागा दिली परंतु हे देत असताना गट नंबर ३४ फेरफार नंबर १९१७ जागेमध्ये बांधकाम केले ग्रामपंचायत मध्ये वस्ती शाळेसाठी जागेचे बक्षीसपत्र हस्तांतरण करत असताना सुदाम खेडकर यांच्या पत्नी आसराबाई सुदाम खेडकर यांच्या नावे बनावट बक्षीस पत्र केल्याची माहिती आहे याचाच अर्थ जिल्हा परिषद अहिल्यानगर गट नंबर ६३३ फेरफार नंबर ६०६ गट नंबर दाखवून दुसऱ्या गट नंबर ३४ मध्ये वस्ती शाळेचे बांधकाम करून कागदपत्रांची हेराफेरी करून गट नंबर ३४ मध्ये अतिक्रमित वस्ती शाळा बांधली असल्याचे निष्पन्न झाले आहे यामुळे गेले २६ वर्ष गृहस्थ सुदाम नामदेव खेडकर हे त्यांच्या मागण्या मान्य न झाल्यामुळे शाळेला कुलूप लावत असल्याने प्रतिवर्षी हा वाद विकोपाला जात असल्याने यामध्ये जांभुळवाडी वस्ती शाळेवरील चिमुकल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

सन २००० या वर्षी सुदाम नामदेव खेडकर याला तत्कालीन गाव पुढारी यांच्या आश्वासनामुळे स्वतःच्या मालकीची तीन गुंठे जागा जांभुळवाडी वस्ती शाळेसाठी दिली परंतु गावच्या थोतांड राजकारणापायी सुदाम नामदेव खेडकर याला झुलवत ठेवले व त्याला दिलेल्या मागण्या पूर्ण करण्यात आल्या नाहीत जांभळवाडी वस्ती शाळेसाठी ग्रामपंचायत बक्षीसपत्र देणेकामी कागदपत्रात फेरफार करणे व जांभुळवाडी वस्ती शाळेसाठी आवश्यक लागणाऱ्या कुठल्याही बांधकाम परवानग्याची पूर्तता न केल्याप्रकरणी तत्कालीन शिक्षक ग्रामसेवक सरपंच व उपसरपंच यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी केली जात आहे.

## लोकशाही वाचविणाऱ्या सेनानींचे योगदान देश कदापी विसरू शकणार नाही–भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी कार्यालय, जालना येथे मोदी सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त ''विश्वास, विकास व जनकल्याण'' या विषयावर प्रबुद्ध नागरी संमेलन तसेच २५ जून १९७५ रोजी तत्कालीन काँग्रेस सरकारने देशावर लादलेल्या आणीबाणीला ५१ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ''काळा दिवस'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाहीच्या रक्षणासाठी आणीबाणीच्या काळात संघर्ष करणाऱ्या ज्येष्ठ लोकशाही सेनानी व ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, रघुनाथ दीक्षित, अरुण उपाध्ये आदींची उपस्थिती होती.



यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, ''२५ जून १९७५ हा भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील काळा दिवस आहे. तत्कालीन काँग्रेस सरकारने आणीबाणी लादून नागरिकांचे मूलभूत अधिकार हिरावून घेतले, विरोधी पक्षांच्या नेत्यांना कारागृहात डांबले आणि प्रसारमाध्यमांवर निर्बंध लादले. त्या कठीण काळात लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी हजारो कार्यकर्त्यांनी संघर्ष केला. अशा लोकशाही सेनानींचे योगदान देश कधीही विसरू शकत नाही.'' ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत देशाने विकास, सुशासन आणि जनकल्याणाची नवी दिशा अनुभवली आहे. गरीब, शेतकरी, महिला, युवा आणि समाजातील प्रत्येक घटकाला केंद्रस्थानी ठेवून अनेक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले. विकसित भारताच्या संकल्पनेला साकार करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक आहे असेही त्यांनी सांगितले. यावेळी मंडळाध्यक्ष महेश निकम, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सराईत गुन्हेगार गणेश झरेकर हर्सुल कारागृहात

जालना । प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील हातडी येथील सराईत गणेश झरेकर गुन्हेगाराविरुद्ध एम.पी.डी.ए. अंतर्गत कारवाई करण्यात आली. परतूर पोलीसांची प्रभावी कारवाई धोकादायक प्रवृत्तीच्या आरोपीस स्थानबद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा अंतर्गत मा. पोलीस अधीक्षक यांनी जालना जिल्हयातील धोकादायक व गुंड प्रवृतीचे काही व्यक्ती विरुध्द स्थानबध्दतेची कारवाई करणे बाबत आदेशित केले होते. त्यानुसार पोलीस ठाणे परतुरचे पोलीस निरीक्षक श्री सुदाम भागवत यांनी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी आर.टी.रेंगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परतुर हद्दीतील काही इसमांची नावे काढलेली होती त्यापैकी गणेश शिवाजी झरेकर वय २७ वर्ष रा. हातडी ता. परतुर जि. जालना याने परतुर शहरात व परिसरात पोलीस स्टेशन परतुर हद्दीत व नजीकचे परिसरात दहशत निर्माण करुन सर्वसामान्य जनतेचे जनजीवन विस्कळीत केले होते. गणेश झरेकर याचे विरुध्द कट रचुन गावठी कट्टयाने जिवे ठार मारणे, दुखापत करणे, लाठीने मारहाण करुन जिवे मारण्याच्या धमकी देणे ईत्यादी अपराध करण्याचे सवयीचा होता. सदर इसमाला स्थानबध्द करणे आवश्यक आहे. त्यानुसार पोलीस ठाणे परतुर येथील त्यांचा गुन्हेगारी अभिलेख तपासला असताचेवर पो, स्टे परतुर येथे खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

३०२,१२० (ब) ३४ भादंवी सह क. ३/२५,२७ भाहका सह क.९ (ब) (ब) न्यायप्रविष्ठ वरील प्रमाणे गुन्हे दाखल असल्याने गणेश झरेकर विरुध्द स्थानबध्द करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक जालना यांचे आदेशाने सदर स्थानवध्द प्रस्ताव तयार करुन त्यास मा. जिल्हाधिकारी जालना यांचेकडे मंजुरीस पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावास मंजुरी मिळाल्याने गणेश झरेकर यास ताब्यात घेवुन योग्य पोलीस बंदोबस्तामध्ये हर्सुल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे जमा केले आहे.सदर ची कारवाई ही मा. तेघबीर सिंह संधु, पोलीस अधीक्षक , मा. विक्रम साळी , अपर पोलीस अधिक्षक , मा.आर.टी. रेंगे , उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि एस.बी. भागवत, पोकॉ/३३० किरण मोरे, पोकॉ/१६०३ ज्ञानेश्वर वाघ, पोकॉ/१४१ नितीन बोंडारे यांनी

## शिक्षणातून मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो –पवार

### स्वामी विवेकानंदमध्ये मोफत प्रवेश प्रक्रिया

मंठा। प्रतिनिधी

शिक्षण हे भविष्याचा पाया असून शिक्षणातून मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन बौद्धिक विकासात भर पडते असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बी. डी. पवार यांनी केले. तालुक्यातील पांगरी गोसावी येथील स्वामी विवेकानंद सेमी इंग्लिश स्कूल येथे मोफत प्रवेश प्रक्रिया राबवली जात असून नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला यावेळी श्री पवार बोलत होते.

या शाळेतील गुणवत्तेबाबत माहिती देताना श्री पवार यांनी सांगितले की, या शाळेतुन दर्जेदार शिक्षण,संस्कार युक्त सेमी इंग्लिश शिक्षण, स्मार्ट क्लास रूम, सांस्कृतिक हॉल उपलब्ध करून देण्यात आले असून विद्यार्थी घडले तरच देशाचे भविष्य उज्वल होईल असे त्यांनी सांगितले. जालना तालुक्यातील बोरगाव येथील नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५६२**

**दिनांक - १०/०६/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती शेख कलीम शेख भिकन रा. अंकड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या बहिन जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | हिना बेगम शेख भिकन | बहिन | १५/०५/१९९१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## जादूटोणा व अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा

### अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध करणारा व त्यांचे समूळ उच्चाटन करणारा अधिनियम, २०१३ (अंधश्रद्धा निर्मलन कायदा) यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी केले आहे. जादूटोणा विरोधी कायदा राज्यस्तरीय समितीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षेत संपन्न झाली. यावेळी बैठकीत महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध करणारा व त्यांचे समूळ उच्चाटन करणारा अधिनियम, २०१३ (अंधश्रद्धा निर्मलन कायदा) यांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



बैठकीत नागरिकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, अंधश्रद्धा व जादूटोणा यांच्या नावाखाली होणाऱ्या फसवणूक, शोषण आणि अमानुष कृत्यांना आळा घालणे तसेच कायद्याबाबत जनजागृती वाढविणे यावर भर देण्यात आला. या कायद्यानुसार नरबळी देणे, भूतबाधा किंवा जादूटोणा काढण्याच्या नावाखाली व्यक्तींना शारीरिक किंवा मानसिक त्रास देणे, चमत्काराचे खोटे दावे करून आर्थिक फसवणूक करणे, अघोरी प्रथा राबविणे महिलांवर जादूटोणा केल्याचा आरोप करून छळ करणे आदी कृत्ये दंडनीय गुन्हे असून कायद्यामध्ये ३ महिने ते ७ वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये संबंधित व्यक्तींविरुद्ध फौजदारी कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. तरी सर्व जनतेने अंधश्रद्धा आणि जादूटोणा अशा फसव्या बाबीपासून दूर राहण्याचे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ तसेच सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अनिता राठोड यांनी केले आहे. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम-२०१३ दि. ३० डिसेंबर, २०१३ रोजी जारी केलेला आहे. सदर कायद्याची परिणामकारक व योग्य अंमलबजावणी करण्यासाठी. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावरील जादूटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आलेली आहे. हा कायदा कोणत्याही धर्माच्या श्रद्धा, पूजा, प्रार्थना, व्रत-उपवास किंवा धार्मिक विधींवर बंदी घालत नाही. फक्त त्या धार्मिक किंवा सामाजिक प्रथांमुळे जर फसवणूक, शोषण किंवा अमानुष वर्तन होत असेल तर त्यावर कारवाई केली जाते. तक्रार कुठे करावी? जवळचे पोलीस ठाणे, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय संबंधित शासकीय यंत्रणा सबब आपल्या आजु-बाजूस काही अनिष्ट, अघोरी, अमानुष प्रथा व जादुटोणा अशा घटना घडत असतील त्यांनी नजिकच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी केले आहे.

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**



# शालेय व्यवस्थापनाचे चूकीचे नियोजन विद्यार्थीनीच्या जीवावर बेतले

## गयानगर परिसरात विद्यार्थीनीला जोराची धडक

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील गयानगर परिसरात शनिवारी स्कूल बसच्या निष्काळजीपणामुळे अभिज्ञा अभिजित माडीवाले (९) रा.गयानगर, बीड ता.जि.बीड या विद्यार्थीनीला शाळेच्या बसमधून उतरल्यानंतर रस्ता ओलांडतांना एका दुचाकीने जोराची धडक दिल्याने तिला जबर मुका मार लागून ती जखमी झाली त्यानंतर तिला उपचाराकामी चिंतामण हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील हे सुट्टीवर असतांना देखील त्यांनी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांना तातडीने घटनास्थळी जाण्यासाठी सांगताच विजय जाधवर सोबत पोलीस अंमलदार राहुल घाडगे, पोलीस हवालदार जाधव, फुलचंद जाधव आणि चालक दत्ता कदम यांनी चिंतामण हॉस्पीटल येथे तात्काळ धाव घेत परिस्थितीची पाहणी केली.





या घटनेची गंभीर दखल घेत जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी बीडमधील सर्व शाळांना आता पत्रव्यवहार करुन बसचालकांना तसेच बसमध्ये असलेले इतर कर्मचारी यांना त्यांनी स्वतः बस थांबवून विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडून घरापर्यंत सुखरुप जाईपर्यंतची जबाबदारी घ्यावी असे लेखी पत्र काढणार असल्याची माहिती दिली.

**बीड तालुक्यातील सर्वच शालेय व्यवस्थापनासोबत एका बैठकीचे आयोजन करणार असून त्यांना वाहतुकीचे नियम आणि विद्यार्थ्यांबाबतच्या सुरक्षितेता व जबाबदारी याबद्दल माहिती देणार आहोत. तसेच स्कूल बसमधील विद्यार्थी घरापर्यंत सुरक्षित जाईपर्यंत बसचालकाची जबाबदारी राहील हे देखील सांगणार आहोत.**

**प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील.**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळा प्रशासन, बसचालक यांनी अधिक दक्षता घेणे आवश्यक असून, नियमांचे पालन न करणाऱ्यांविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी दिला. तसेच वाहनचालकांनी देखील वाहने चालवतांना वेगावर नियंत्रण ठेवावा असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी केले आहे. या घटनेनंतर शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, पालकांकडूनही अधिक कडक सुरक्षा उपाययोजनांची मागणी केली जात आहे. सदरील मुलीचे पालक नामे अभिजीत सुभाष माडीवाले यांनी पोलीसांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले आहे.

# बिबट्याचा हल्ल्यात वासराचा फडशा

## घटनास्थळी बिबट्याच्या पावलांचे ठसे; शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मुगगाव लांबरवाडी परिसरात बिबट्याचा वाढता वावर पुन्हा एकदा समोर आला असून, केरु काशिनाथ लांबरुड यांच्या वासरावर बिबट्याने हल्ला करून त्याला ठार मारल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.







मिळालेल्या माहितीनुसार, केरु काशिनाथ लांबरुड यांचे वासरू शेतालगतच्या परिसरात होते. रात्रीच्या वेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने वासरावर अचानक हल्ला केला. हल्ला इतका तीव्र होता की वासराचा जागीच मृत्यू झाला. सकाळी शेतात गेल्यानंतर वासरू मृत अवस्थेत दिसून आले. त्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी पाहणी केली असता, परिसरात बिबट्याच्या पावलांचे स्पष्ट ठसे आढळून आले. या ठशांमुळे हा हल्ला बिबट्यानेच केल्याची खात्री अधिक बळकट झाली.

संबंधित शेतकऱ्याला शासनाच्या नियमानुसार तातडीने नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून या परिसरात बिबट्याचा वावर असल्याच्या


◀◀ पान ३ वर

# तीन बेकायदेशीर ‘स्पा सेंटर’ला ठोकले टाळे

## आयपीएस ऋषिकेश शिंदे यांची धडक कारवाई

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील पोखरी रोड आणि तथागत चौक परिसरात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या तीन स्पा सेंटर्सवर पोलिसांनी शुक्रवार २६ जून रोजी धडक कारवाई केली. अंबाजोगाईचे सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे (आय पी एस) यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने ही कारवाई करून तिन्ही स्पा सेंटर्सला टाळे ठोकले आहे.शुक्रवार २६ जुन रोजी अंबाजोगाई उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाला शहरातील काही स्पा सेंटर्समध्ये बेकायदेशीर कृत्ये आणि नियमांचे उल्लंघन होत असल्याची खात्रीशीर





माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, पोलीस उपनिरीक्षक फड, पोलीस अंमलदार खरटमल, खेलबुडे, खंदारे तसेच महिला पोलीस अंमलदार किर्दंत आणि भुसारी यांच्या पथकाने पोखरी रोडवरील दोन आणि तथागत चौकातील एका स्पा सेंटरवर अचानक छापे टाकले. या कारवाई दरम्यान स्पा सेंटर चालवण्याबाबतचे कोणतेही वैध परवाने आणि कागदपत्रे चालकांना सादर करता आली नाहीत. पोलिसांनी या कारवाईत तिन्ही स्पा सेंटर्स तात्काळ सील करून ते बंद केले आहेत. या धडक कारवाईमुळे अंबाजोगाई शहरातील अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. याप्रकरणी पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. नागरिकांच्या हिताला प्राधान्य देऊन अशी कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. या कारवाई बद्दल स्थानिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.‘



**माजलगाव : येथील जिल्हा वकील संघ माजलगाव येथे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती दि २६ जुन शुक्रवार रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली,यावेळी वकील संघाचे अध्यक्ष भाई ड. नारायण गोले पाटील यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यावर सविस्तर मनोगत व्यक्त केले तर उपाध्यक्ष राहुल बजाज यांनी उपस्थितांचे आभार मानले यावेळी सदस्य यांच्यासह न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.**

# उद्धव ठाकरे यांच्या स्वागतासाठी शिवसैनिकांनी उपस्थित रहावे -वरेकर

बीड । प्रतिनिधी

जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सर्व पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, शिक्षकसेना, किसानसेना व शिवसैनिक यांना



सुचित करण्यात येते की, रविवार दि. २८ /६/२०२६ रोजी शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे हे धाराशिव येथील जाहीर सभा आटोपून संभाजीनगरकडे जाताना बीड शहरालगत असलेल्या संभाजी महाराज ( लक्ष्मी ) चौक जिरेवाडीजवळ बीड जिल्हा शिवसेनेचा व शेतकऱ्यांचा सत्कार स्विकारण्यासाठी संध्याकाळी ठिक ७ वाजता थांबणार आहेत यावेळी साहेबांचा भव्य दिव्य सत्कार करण्यात येणार आहे, बीड जिल्हा उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पाठीशी आहे हे दाखवून देण्यासाठी सर्व पदाधिकारी व शेतकरी व निष्ठावंत शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी केले आहे.





बिदर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स बिदर च्या वतीने बीड शहरातील मिलिया महाविद्यालयाचे हिंदी विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.अय्युब पठाण यांचे चिरंजीव डॉ.मोहम्मद आनस यांना डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी डायरेक्टर कौझिलगी मॅडम , प्रमुख पाहुणे प्रो.डॉ. आयुबखान पठाण, मिसेस पठाण ,डॉ. मोहम्मद आनस खान पठाण आदी.

# रामनाथ खोड यांच्या माध्यमातून शनी मंदिर देवस्थानाचे अपील फेटाळले

बीड । प्रतिनिधी

रमेश सोमाणी यांची मालमत्ता ही शनी मंदिर देवस्थानाचीच असल्याचा दावा करत रामनाथ खोड यांच्या माध्यमातून श्री शनी मंदिर देवस्थानचे सचिव संतोष किसनराव जाधव यांनी दाखल केलेले अपील जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, बीड यांनी फेटाळून लावले आहे. अपीलामध्ये मुन्तखाब नोंदीचा आधार घेत संबंधित मालमत्ता शनी मंदिर देवस्थानाचीच असल्याचा दावा करण्यात आला होता. सदर प्रकरण सन २०२२ पासून न्यायासनासमोर प्रलंबित होते. अपील दाखल करण्यास झालेल्या प्रदीर्घ विलंबाचा प्रथम विचार करण्यात आला. विलंब माफ करण्यात आल्यानंतर प्रकरण गुणदोषांच्या आधारे अंतिम सुनावणीसाठी घेण्यात आले.

सुनावणीदरम्यान सोमाणी यांच्या वतीने ॲड. आर. बी. जाजू यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, शनी मंदिर देवस्थानच्या सार्वजनिक विश्वस्त नोंदणीतील अनुसूची-१ (-) मध्ये देवस्थानच्या मालमत्तांची अधिकृत नोंद असून त्यामध्ये रमेश सोमाणी यांच्या मालमत्तेचा कोणताही समावेश नाही. तसेच सन १९६२ मधील मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये शनी मंदिर देवस्थानच्या मालमत्तांचा स्पष्ट उल्लेख असून त्यामध्येही संबंधित मालमत्तेचा समावेश नसल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. याशिवाय, रमेश सोमाणी यांच्या मालमत्तेची नोंद नोंदणीकृत खरेदीखताच्या आधारे कायदेशीररित्या झालेली असल्याचा मुद्दाही त्यांनी ठामपणे मांडला.

दरम्यान, रामनाथ खोड यांनी मंत्री कन्स्ट्रक्शन परिसरातील ७५ हून अधिक घरांवर शनी मंदिर देवस्थानाचा हक्क असल्याचा दावा करत जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश देत प्रकरण जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, बीड यांच्याकडे वर्ग केले. या चौकशीदरम्यान मंत्री कन्स्ट्रक्शनमधील ७५ हून अधिक घरधारकांना, त्यामध्ये सोमाणी यांचाही समावेश होता, नोटिसा बजावण्यात आल्या व सविस्तर चौकशी करून अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला. तसेच,

◀◀ पान ३ वर

# अन्न सुरक्षा अंतर्गत हॉटेल, रेस्टॉरंट व अन्न व्यवसायिकांसाठी मार्गदर्शन बैठक

बीड । प्रतिनिधी

अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने हॉटेल, रेस्टॉरंट, कॅफे, खानावळ, ढाबा, बेकरी, मिठाई दुकान, केटरिंग, फूड कोर्ट, ज्यूस बार, क्लाऊड किचन, ऑनलाइन फूड डिलिव्हरी सेवा तसेच सर्व अन्न व्यवसायिकांसाठी मार्गदर्शन बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीच्या प्रारंभी अन्न सुरक्षा मित्र पवनकुमार धूत यांनी उपस्थितांचे स्वागत करून





प्रास्ताविक केले. त्यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे महत्त्व, सुरक्षित व दर्जेदार अन्न पुरविण्याची जबाबदारी तसेच ग्राहकांचा विश्वास जपण्यासाठी नियमांचे पालन करण्याची आवश्यकता स्पष्ट केली. यावेळी त्यांनी या प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत प्रत्येक हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबा, कॅफे, केटरिंग, क्लाऊड किचन, स्वीट मार्ट व इतर अन्न व्यवसायिकांनी हे प्रशिक्षण घेऊन त्याचे प्रमाणपत्र आपल्या आस्थापनात प्रदर्शित ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच लवकरच बीड जिल्ह्यात अन्न पदार्थ प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

यानंतर अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाढे, अंकुश नरवडे व सिद्धांत खंडारे यांनी महाराष्ट्र राज्याचे आयुक्त, अन्न व औषध प्रशासन . तुकाराम मुंडे यांनी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने नव्या नियमावलीची माहिती दिली. त्यांनी परवाना व नूतनीकरण, स्वच्छता, सुरक्षित

◀◀ पान ३ वर

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कडा व पाटोदा येथे अकॅडमी सुरू करणार –माजी आ.भीमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर हा परिसर दुष्काळी पट्टा समजला जातो या भागातील अनेक शेतकरी व शेतमजूर पोट भरण्यासाठी स्थलांतर करतात अशा गोरगरिबांच्या मुलांसाठी संस्थेच्या वतीने आष्टी व धानोरा येथे करियर अकॅडमी सुरू केलेली आहे आता पुढील महिन्यात कडा आणि पाटोदा येथेही करिअर अकॅडमी सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा संस्था अध्यक्ष व माजी आमदार भीमराव धोंडे यांनी कडा येथे केली.

याबाबत अधिक माहिती अशी की शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आनंद चॅरिटेबल संस्था व इतर संस्थेतील इयत्ता दहावी - बारावी मध्ये गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा कडा येथील आनंदराव धोंडे



महाविद्यालयात माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गुणवंताचा सत्कार ही २६ वर्षापासून चाललेली अखंडीत परंपरा आहे. त्या सत्कार प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. भीमराव धोंडे होते. यावेळी व्यासपीठावर महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, युवा नेते अभयराजे धोंडे, सामाजिक कार्यकर्ते बाबुलाल भंडारी, ह.भ.प. आंधळे महाराज, पत्रकार उत्तमराव बोडखे,सुधीर ढोबळे, मधुकर शिरोळे, पांडुरंग महाराज कर्डीले, शहादेव खेडकर व इतर उपस्थित होते.

पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, शिक्षण घेताना कष्ट करणाऱ्या विद्यार्थ्यांना यश निश्चित मिळते. आपली संस्था गेल्या सव्वीस वर्षांपासून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करीत आहे. सत्कारामुळे इतर विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते. यापुढे संस्थेच्या प्रत्येक शाळेने ९० टक्के पेक्षा जास्त निकाल लावावा. गेल्या दोन वर्षांपासून आष्टी येथे करिअर अकॅडमी आहे. दोन वर्षांत दोनशे पेक्षा जास्त विद्यार्थी वेगवेगळ्या ठिकाणी नौकरीस लागले आहेत.

आता धानोरा येथे त्या परिसरातील गोरगरीबांच्या मुलांसाठी धोंडे करिअर अकॅडमी सुरू केली आहे. याचा फायदा घ्यावा.पुढील महिन्यात कडा व पाटोदा येथे अकॅडमी सुरू करण्यात येणार आहे. अकॅडमी मध्ये विद्यार्थ्यांनी जाऊन नियमित सराव करावा तसेच अभ्यासिकेत अभ्यास केल्यास निश्चितच यश मिळेल. पालकांनी आपल्या मुला - मुलींना

◀◀ पान ३ वर

# आष्टी-डोईठाण रस्त्यावर दिवसा-ढवळ्या महिलेचे मंगळसूत्र ओरबडले

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील आष्टी-डोईठाण रस्त्यावरील हॉटेल कार्तिकजवळ शनिवारी दुपारी भररस्त्यात एका महिलेचे मंगळसूत्र दुचाकीस्वार दोन चोरांनी दिवसाढवळ्या ओरबडून नेल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, घटनेच्या वेळी संपर्क करूनही पोलिसांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.शेतात काम करताना घातला दरोडा

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी ३ वाजून २० मिनिटांच्या सुमारास एक महिला आष्टी-डोईठाण रस्त्यावरील हॉटेल कार्तिक परिसराजवळ असलेल्या शेतामध्ये काम करत होती. याच वेळी एका दुचाकीवरून दोन अज्ञात इसम तिथे आले. परिस्थितीचा अंदाज घेत या भामट्यांनी थेट महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने ओरबडले आणि दुचाकीवरून अत्यंत वेगाने पळ काढला.महिलेने आरडाओरड केल्यानंतर आजूबाजूला असलेल्या नागरिकांच्या हा प्रकार लक्षात आला.काही सतर्क नागरिकांनी तात्काळ दुचाकीवरून त्या चोरांचा थरारक पाठलाग केला. मात्र, चोरटे सुसाट वेगाने आष्टीच्या दिशेने किंवा ग्रामीण भागातील रस्त्याने पसार होण्यात यशस्वी झाले.

फोन खणखणले, पण पोलीस ढिम्म!

या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी आणि प्रत्यक्षदर्शींनी तात्काळ कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिसांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.जागरूक नागरिकांनी पोलीस निरीक्षक,

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk